जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मध्य शहर, बाजारपेठेतील रखडलेली कामे जलद गतीने पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन

## अहिल्यानगर महानगरपालिकेने संपूर्ण शहराचीच 'कचराकुंडी' करत नगरचा 'नरक' केला : शिवसेना शहरप्रमुख किरण काळे

नगर – मध्य शहरास बाजारपेठ एकाच वेळेला चोहोबाजूंनी खांदून ठेवत ऐन पावसाळ्यात व्यापारी, सर्वसामान्य नगरकरांची प्रचंड पिळवणूक मनपा प्रशासन करत आहे. विकासाच्या नावाखाली नियोजनशून्य कारभार सुरू असून आंधळं दळतंय, कुत्र पीठ खातंय अशी शहराची दैनावस्था मनपा प्रशासन आणि सत्तेचा रिमोट कंट्रोल असणाऱ्या सत्ताधारी महायुतीने केला आहे. आता खूप झालं. नगरकरांसाठी हे सहन करण्यापलीकड गेलं आहे. बाजारपेठेतील रखडलेली कामे नियोजनबद्धरित्या जलद गतीने पूर्ण करा अन्यथा मनपाला तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ठाकरे शिवसेनेच्यावतीने शहर प्रमुख किरण काळे यांनी आयुक्त यशवंत डांगे यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. कचरा संकलन यंत्रणेचा बोजवारा उडाला असून मनपाने संपूर्ण शहराचीच कचराकुंडी करत नगरचा नरक केल्याचा हल्लाबोल यावेळी चित्रा टॉकीज परिसराची पाहणी करताना काळे यांनी केला.



नागरिकांच्या तक्रारींनंतर चितळे रोड ते चित्रा टॉकीज ते लक्ष्मी कारंजा चौक ते पटवर्धन चौक या मार्गावर सुरू असणाऱ्या ड्रेनेज, रस्त्याच काम, तसेच चित्रा टॉकीज परिसरामध्ये रस्त्यावर साचलेल्या कचऱ्याची पाहणी शहरप्रमुख किरण काळे यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत केली. यावेळी भर रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर दुर्गंधीयुक्त कचरा आढळून आला.

शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये असणाऱ्या चित्रा टॉकीज परिसरामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर कचरा साचला आहे. नागरिकांच्या तक्रारीनंतर या परिसराची पदाधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. यावेळी उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, कामगार आघाडीचे नेते विलास उबाळे, शहर कामगार सेना प्रमुख गौरव ढोणे, युवा सेना अहिल्यानगर विधानसभा युवा अधिकारी आनंद राठोड, सुनील भोसले, व्यापारी आघाडीचे महावीर मुथा, ओबीसी आघाडीचे गणेश आपरे, किशोर कोतकर, सामाजिक न्याय विभागाचे विकास भिंगारदिवे, बबन आढाव, जयराम आखाडे, बाबासाहेब वैरागर, मागासवर्गीय विभागाचे रोहिदास भालेराव, देवराम शिंदे, दीपक काकडे, आकाश आल्हाट, आनंद जवंजाळ आदीं उपस्थित होते.

काळे यांनी निवेदनात म्हटले आहे, पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर साचलेला कचरा कुजल्यामुळे प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मनपाला आजवर अनेक वेळा स्वच्छतेच्या उत्तम कामगिरीबद्दल शासनाची विविध नामांकन व पारितोषिक प्राप्त झाल्याचा गवगवा सातत्याने केला जातो. मात्र चित्रा टॉकीजसह संपूर्ण शहरातील नागरिकांना प्रत्यक्ष दैनंदिन जीवनामध्ये कचरा संकलनाच्या बाबतीमध्ये येणारा अनुभव हा अत्यंत वाईट आहे. शहराच्या अनेक भागांमध्ये आजही घंटागाडी दररोज येत नाही. आलीच तर त्याच्या वेळा निश्चित नाहीत. त्यातही ती एखाद्या परिसरात गेली तर नागरिक बाहेर येऊन कचरा टाकण्याआधीच गाडी पुढे निघून गेलेली असते. नागरिक दोन दिवसांपेक्षा अधिक काळासाठी घरामध्ये कचरा साठवून ठेवू शकत नाहीत. नाइलाजास्तव हा सर्व कचरा नागरिकांना रस्त्यावरच टाकण्याची अपरिहार्यता निर्माण होते.

### यांनी संपूर्ण शहराचीच कचराकुंडी, उकिरडा केला

मनपाच्या कचरा संकलन विभागाचा नियोजन शून्य कारभार या स्थितीला जबाबदार आहे. त्यामुळे संपूर्ण शहराची कचराकुंडी, उकिरडा झाला आहे. त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून मनपाला आजवर शहर स्वच्छतेची मिळालेली पारितोषिक आपण स्वतःहून ती शासनाला परत केली पाहिजेत. कारण ही बिरूदावली मिरविण्याचा कोणताही अधिकार हा मनपाला राहिलेला नसल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

### पावसाळ्याआधी झोपले होते काय?

चितळे रोड ते चित्रा टॉकीज ते लक्ष्मी कारंजा चौक ते पटवर्धन चौक या मार्गावर ड्रेनेज, रस्त्याची कामे सुरू आहे. या कामाची पाहणी करताना काळे म्हणाले, पावसाळ्यापूर्वी मनपा प्रशासन झोपले होते काय? पावसाळ्यापूर्वी ही कामे सुरू करून पूर्ण करण्याची गरज होती. मात्र ऐन पावसाळ्यामध्ये हा संपूर्ण परिसर अक्षरशः एकाच वेळेला दोन्ही बाजूने खोदून ठेवून या परिसरातील नागरिक, व्यापाऱ्यांचे तसेच मोठ्या प्रमाणावर या भागातून जाणाऱ्या नगरकरांचे जगणे मुश्किल केले आहे.

### लहान मुलं, विद्यार्थी, पालक, व्यापारी, ग्राहक वेठीस

काळे पुढे म्हणाले, बरं एवढेच नाही तर या परिसरामध्ये मार्कंडेय विद्यालय, प्रगत विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्रशाला, पुढील बाजूला बाई इचरचबाई प्रशाला यासारख्या मोठ्या शाळा तसेच स्नेहालय संचलित उडान प्रकल्प, अनाम प्रेम सारखी सामाजिक संस्था असून यामधून हजारो विद्यार्थी, पालक रोज ये–जा करतात. गांधी मैदान आणि परिसरामध्ये दूध, भाजीपाला विक्रेते तसेच अन्य व्यापारी आस्थापना व रहिवासी देखील राहतात. या सगळ्यांच्या रोजगार आणि राहण्यावर याचा गंभीर परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांचा, नागरिकांचा अपघात झाला तर रुग्णालयापर्यंत पोहचणे सुद्धा शक्य होणार नाही अशी परिस्थिती आहे. हीच परिस्थिती शहराच्या मध्यवर्ती भागात बहुतांश ठिकाणी असून विकास कामांच्या नावाखाली बाजारपेठेचे अर्थकारण संपूर्ण बाजारपेठ एकाच वेळी खोदून ठेवल्यामुळे प्रचंड अडचणीत आले आहे. यामुळे बाजारपेठ, व्यापारी उध्वस्त होण्याची वेळ आली आहे. लहान मुलं, विद्यार्थी, पालक, व्यापारी, ग्राहक अशा सर्वांनाच वेठीस धरण्याचं काम मनपा प्रशासन करीत आहे.

### अधिकारी, पुढारी केवळ फोटोसेशनपुरतेच

आयुक्त, मनपा अधिकारी, शहराचे लोकप्रतिनिधी, सत्ताधारी महायुतीचे माजी आणि भावी नगरसेवक शहरात सध्या विविध ठिकाणी भेटी देत फोटोसेशन करताना नगरकरांना पाहायला मिळतात. मात्र प्रत्यक्षात नियोजनशून्य काम आणि कामांना नसणारी गती, अनेक वेळा बंद पडणारी कामं, यामुळे महिनोन् महिने हा प्रकार असाच सुरू राहण्याचे चित्र दिसते आहे. याबाबत मनपा आयुक्तांनी शहराच्या मध्य बाजारपेठेतील सुरू असणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांशी निगडित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार यांना नियोजनबद्ध, तातडीने, जलद गतीने सर्व कामे पूर्ण करण्याबाबत सूचना कराव्यात, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. याबाबत आपण योग्य ती पावले न उचलल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

### ... अन्यथा फलक झळकवू, मनपाच्या दारात बोंबाबोंब करू

चित्रा टॉकीज परिसरामध्ये रस्त्यावर साचलेला कचरा दोन दिवसांच्या आत उचलून परिसर स्वच्छ न केल्यास सदर ठिकाणी शहराची कचराकुंडी केल्याबद्दल मनपा प्रशासन, सत्ताधारी महायुतीचे आभार मानणारा जाहीर फलक लावून जाहीर निषेध करण्याचा इशारा शिवसेनेने दिला आहे. त्यानंतरही आवश्यक ती कार्यवाही न केली गेल्यास नागरिकांना काय यातना होतात याची मनपाला जाणीव व्हावी याकरिता सदर दुर्गंधीयुक्त कचरा हा शिवसेना मनपा कार्यालयात घेऊन येत मनपाच्या दारात बोंबाबोंब आंदोलन करण्याचा इशारा किरण काळे यांनी दिला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### भारतीय 'योगा'ला आंतरराष्ट्रीय 'दिवस'

भारतीय संस्कृतीत शरीराच्या बाह्य मजबुतीसह मनाच्या अंतरीत असलेल्या भावभावनांना महत्त्व देण्यात आले आहे.

ऋषी, वेद परंपरेपासून प्रचलित आपल्या योगसाधनांना आता आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता व मानसन्मान मिळू लागलाय. म्हणूनच आता २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. बहुसंख्य देशात या दिवशी योगासने व तत्सम कार्यक्रम संपन्न होतात.

'योग साधना' फार उच्च व जीवन जगणे, जीवन सार्थक करणे यासाठी अत्यंत महत्त्वाची, गरजेची आहे. योग जीवनशक्ती मजबूत करून शरीराच्या पेशींचे पुनरुज्जीवन करतो. विलक्षण योग्य सातत्य ठेवल्यास अगदी आत्म्यापासून परमात्म्यापर्यंत जाता येऊ शकते.

आजच्या प्रदूषित, चिंतामय व धावपळीच्या दिवसांत योगाची गरज अधिकच वाढते. योग केल्याने शरीरात लवचिकता वाढते. वेदनांपासून आराम मिळतो. रक्ताभिसरण चांगले होते. निरंतर योग आसनाने शारीरिक, मानसिक वृद्धांना काही सहज योग उपलब्ध आहेत.

काही सहज योग आहेत जे घरी किंवा बागेत वगैरे विनासायास करता येतात. अशा ६ योगांबद्दल माहिती घेऊया. ही ६ आसने आठवड्यातून २/३ वेळा करता येतात. शरीराचे संतलन अबाधित राहील.

१) ताडासन– यामुळे पाठीचा कणा ताणला जातो. शरीर संतुलित व सवचिक बनते. मजबूत होते.

२) भुजंगासन– या आसनामुळे मूत्रपिंडांना विशेष फायदे होतात. पाठ, छाती, हृदय, खांदे, मान व एकूण सर्व स्नायू मजबूत बनतात.

३) वृक्षासन– पाठीचा कणा लवचिक करणाऱ्या या आसनाने संयम, सहनशीलता वाढवते.

४) बद्धकोनासन– हे आसन मांड्या व कमरेला चांगला ताण देऊन रक्ताभिसरण वाढवते.

५) वज्रासन– जेवणानंतर केलेल्या या आसनाने गॅस आणि बद्धकोष्ठतेची समस्या कमी होते, राहात नाही.

६) बालासन– याला शशांकसन असेही म्हणतात. शरीराला आराम व मनःशांती देते.

बदललेल्या वातावरणात तज्ज्ञ व्यक्तींकडून शिकून नियमित योगासने केल्यास आरोग्यदायी निरामय आयुष्य जगता येते.

– किशोर गांधी

# मोहरम मिरवणूक मार्ग तातडीने दुरुस्त करून नागरी सुविधा उपलब्ध कराव्यात : समितीची मनपाकडे मागणी

नगर – मोहरम निमित्ताने शहरात विविध ठिकाणी सवारींची मिरवणूक आस्था, श्रद्धा व धार्मिक उत्साहात पार पडणार आहेत. सध्या मिरवणूक मार्गावरील रस्त्यांची दयनीय अवस्था, अपुऱ्या सुविधा आणि अव्यवस्थेमुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मोहरम उत्सव समितीच्या वतीने महापालिकेकडे मिरवणूक मार्गाची तातडीने दुरुस्ती करणे तसेच मूलभूत नागरी सुविधा पुरविण्याची मागणी हाजी करीम हुंडेकरी, खलील सय्यद, आय.बी. शाह, फारुख रंगरेज, सलीम रेडियमवाला, अल्तमश जरीवाला, निसार बागवान, बागवान शफीक पैलवान, आरिफ पठाण, अझर शेख, वसीम खान आदींनी केली आहे.

शहरातील मुख्य मिरवणूक मार्गांमध्ये लक्ष्मी कारंजा ते पटवर्धन चौक, जुना कोर्ट या मार्गावर रस्त्यांचे काम सुरू असल्याने मिरवणुकीला अडथळा ठरु शकतो. त्याचे काम त्वरित पूर्ण करण्यात यावे. तसेच मिरवणूक मार्गामध्ये मोठ्या प्रमाणावर खड्डे, नाल्यांची झाकण उघडी, ड्रेनेज पाणी रस्त्यावर साचलेले तसेच कचऱ्यांची ढिगारे दिसून येत आहेत. अशा परिस्थितीत मिरवणुका काढणे धोकादायक ठरू शकते, असे उत्सव समितीचे म्हणणे आहे. याशिवाय रात्रीच्या वेळेस स्ट्रीट लाईट बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य काही महत्वाचे ठिकाणी असते, जे अपघातास कारणीभूत ठरू शकते.

समितीने महापालिका प्रशासनाला दिलेल्या निवेदनात करण्यात आलेल्या मागण्या : मिरवणूक मार्गांची तातडीने दुरुस्ती करून डागडुजी व खड्डे बुजवणे, नाले व गटारींची स्वच्छता करणे आणि झाकण लावणे, रस्त्यांवरील वीज व्यवस्था सुरळीत ठेवणे व खराब दिव्यांची दुरुस्ती करणे, मिरवणूक मार्गावर पोलीस बंदोबस्त व वाहतूक नियंत्रणाची योग्य व्यवस्था करणे, रस्त्यांच्या दुतर्फा साफसफाई व कचरा उचलण्याची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, मोबाइल शौचालये आणि आरोग्य तपासणी केंद्रांची व्यवस्था करणे, धोकादायक इमारत व अतिक्रमणे तातडीने काढून घेणे, मोकाट कुत्रे व जनावरांचा बंदोबस्त करणे. या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. महापालिकेने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देत लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा सर्वच सामाजिक, धार्मिक संघटना व स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मोहरम शांततेत व सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रशासन, महापालिका व पोलीस यंत्रणांनी समन्वय ठेवून काम करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.


### श्रीमती आशाबाई छजलानी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – हरी मळा येथील रहिवासी श्रीमती आशाबाई मनोहर छजलानी (वय ६५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २० जून रोजी भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.


त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. योगेश छजलानी यांच्या त्या आई होत.

### गजानन ससाणे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सारसनगर येथील रहिवासी विशाल गणपती ट्रस्टचे विश्वस्त गजानन जगन्नाथ ससाणे (अण्णा) (वय ६७) यांचे १९ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. सारसनगर येथील हॉटेल राजधनचे ते संचालक होते. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, दोन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. अनिल व राजेंद्र ससाणे यांचे ते मोठे बंधू होत. श्रीराम सेवा मंडळ हनुमान चालिसा कमिटीचे ते सदस्य होते.

### उदय झावरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – आगरकरमळा येथील रहिवासी उदय भाऊसाहेब झावरे (वय ७७) यांचे १९ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, २ भाऊ, भावजया, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चि. डॉ. सागर झावरे, रोटरी क्लब अ.नगरचे गव्हर्नर व अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सदस्य क्षितीज झावरे यांचे ते वडील तर माजी आ.नंदकुमार झावरे, प्रकाश झावरे यांचे ते बंधू होत.

### वेरुनिका मैड यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – कामगार हॉस्पिटलच्या सेवानिवृत्त नर्स व शिवसेनेच्या माजी जिल्हाध्यक्षा वेरुनिका सुरेश मैड (वय ६६) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भारत मैड यांच्या त्या मातोश्री होत.

# बनावट ऑनलाईन ॲप माध्यमातून 'गँगस् ऑफ शनिशिंगणापूर' कडून भाविकांची होणारी लूट थांबवा अन्यथा मंदिर महासंघातर्फे मोठे आंदोलन

नगर – श्री क्षेत्र शनिशिंगणापूर या ठिकाणी श्री शनिदेवाचे जागृत तीर्थस्थळ आहे. मात्र येथे 'गँगस ऑफ शनिशिंगणापूर 'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टोळ्यांकडून काही महिने नव्हे तर वर्षानुवर्षे पद्धतशीरपणे फसवणूक केली जात असल्याचे प्रसिद्धीमाध्यमांनी उघड केले आहे. ऑनलाईन पूजा, व्हिडिओ क्लिपर आधारित फसवणूक केली जाते आपली पूजा देवळात करवून दिली जाईल करून उपवास, अभिषेक, काळे तेल, व्रत इ. बाबतीत ११०० पासून ५१०० रुपयांपर्यंत रक्कम उकळी जाते प्रत्यक्षात ती होत नाही, जबरदस्तीने पूजा साहित्य घेण्यास भाग पडणे, बनावट पावती पुस्तके छापून फसवणूक करणे अशा बऱ्याच घटना घडत आहेत.

या घटना थांबवण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अहिल्यानगर येथील अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना निवेदन देण्यात आले. या घटनेची सखल चौकशी करून ग्राहक संरक्षण कायद्यान्वये योग्य गुन्हे नोंदवून तात्काळ प्रथम माहिती अहवाल सादर करावा. भाविकांची अशी होणारी फसवणूक तात्काळ थांबवण्यात यावी व दोषींवर कडक कारवाई करावी अन्यथा मंदिर महासंघातर्फे मोठे आंदोलन छेडण्यात येईल असेही निवेदनाच्या माध्यमातून प्रशासनाला सांगितले

यावेळी निवेदन देताना महाराष्ट्र मंदिर महासंघाचे भरत शिंदे, बापू ठाणगे, विशाल शितोळे, अरविंद काळे, सुनील शिंदे, सारंग अकोलकर, गणेश गोरे, हिंदू जनजागृती समिती रामेश्वर भूकन, हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे अजिंक्य गायकवाड आदी उपस्थित होते.



महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने निवेदन देताना सुनील शिंदे, शंकर गोरे, सुनील शिंदे, बापू ठाणगे



राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या शहर सचिव आरती उफाडे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. अनिता दिघे, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, मनविसे जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, संदीप चौधरी, किरण प्रशांत रोकडे, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष अनिकेत शियाळ, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रवीण गायकवाड आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नगर–कल्याण हायवे लगतच्या अवैध उत्खननावर कारवाई करा अन्यथा बेमुदत उपोषणाचा इशारा

नगर – पारनेर तालुक्यातील मौजे माळकुप येथील नगर–कल्याण हायवे लगत मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करून मुरूमची भर टाकल्याने तेथील पंचनामा करून महाराष्ट्र जमीन महसूल सुधारणा नियम २०१७ व १२ जानेवारी २०१८ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. १५ दिवसात कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

# रेशनकार्ड कामे रखडल्यामुळे गोरगरीब धान्यापासून वंचित

## ऑनलाईन प्रक्रिया वारंवार ठप्प होत; अडचणींकडे मंत्र्यांचे वेधले लक्ष

नगर – गोरगरीब व वंचित नागरिकांना नियमितपणे शिधा धान्य मिळावे, यासाठी अडथळा ठरत असलेली रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रिया विनाविलंब व्हावी, या मागणीसाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे नगर तालुकाध्यक्ष रामदास फुले यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना निवेदन दिले.

फुले यांनी भुजबळ यांची मुंबई येथे भेट घेऊन गरजू लाभार्थ्यांच्या समस्या मांडून लक्ष वेधले. तालुक्यातील अनेक कुटुंबांना वेळेवर रेशनिंगचे धान्य मिळत नाही. काही लाभार्थ्यांची रेशनकार्डची नोंदणी अद्याप अपूर्ण आहे, तर काहींच्या कार्डावर धान्य वितरण रखडलेले आहे.

रेशन कार्डासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया अत्यंत संथ असून महिनोमहिने प्रलंबित राहत आहे. यामध्ये अनेकांना खासगी एजंटकडेच धाव घ्यावी लागते, अन्यथा प्रक्रिया मार्गी लागत नाही. परिणामी गोरगरीब नागरिकांना अन्नधान्यापासून वंचित रहावे लागत असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.



अडथळा ठरत असलेली रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रिया विनाविलंब व्हावी, या मागणीचे निवेदन अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना देताना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे नगर तालुकाध्यक्ष रामदास फुले.

संबंधित यंत्रणांनी रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रियेची अंमलबजावणी अधिक पारदर्शक व गतीशील करावी. जेणेकरून गोरगरिबांना शिधा धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, प्रचारक नागेश गवळी, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, तालुका अध्यक्ष रामदास फुले, प्रदेश सरचिटणीस अनिल निकम, बंडू कोथिंबिरे, अनिल चौधरी, अनिल गाडीलकर, शंकर भुजबळ, सुभाष गायकवाड आदींसह समता परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### निरोगी किडनीसाठी

आजकालच्या चुकीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे मूत्रपिंडाच्या समस्या सामान्य होत आहेत. जर तुम्हाला तुमचे मूत्रपिंड निरोगी राहायचे असेल तर हिरव्या धणे रस हा एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय असू शकतो. कोथिंबीरमध्ये असलेले डिटॉक्सिफायिंग गुणधर्म शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात. तसेच, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि फायबर मूत्रपिंड आणि मूत्रमार्ग मजबूत करतात. कोथिंबीरचा रस मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडातील दगड आणि इतर समस्या टाळतात.

## पाककला

### पुरणपोळी आणि अटीव दूध

**साहित्य :** ५०० ग्रॅम चण्याची डाळ, ५०० ग्रॅम गुळ, २ चमचे वेलची पावडर, १/२ चमचा जायफळ पावडर, २ वाट्या मैदा, दोन वाट्या गव्हाचे पीठ, ३ चमचे तेल मोहनासाठी, १/२ चमचा मीठ,

**कृती :** प्रथम चण्याची डाळ पाच-सहा तास भिजत घालावी आणि नंतर मऊसर शिजवून घ्यावी. शिजवल्यानंतर चाळणीमध्ये निथळत ठेवावी आणि शिजलेल्या डाळीबरोबर गुळ मिक्स करून मंद गॅसवर घाटंत राहावे. गुळ आणि चण्याची डाळ एकजीव होऊन काठाने पुरण सुकत आहे असं दिसल्यावर काढून थंड करून ठेवावं आणि पुरण यंत्रातून पूरण काढून घ्या. त्यामुळे बारीक असं सुंदर माऊसुत पुरण तयार होते. नंतर त्यात वेलची आणि जायफळ पावडर नीट मिक्स करून पुरणाचे गोळे बनवून घ्यावेत. पुरण तयार करण्याआधी मैदा व गव्हाचे पीठ नीट चाळून घेऊन त्यात मीठ आणि मोहनाचे तेल नीट मिक्स करून थंड पाण्याने मऊ असे मळून ठेवावे. तीन तास अगोदर मळुन ठेवल्यास छान मूरते आणि पुरणपोळ्या पातळ लाटता येतात व खुसखुशीत होतात. पिठाचे आणि पुरणाचे गोळे करून घ्यावे. पिठाचा गोळा पुरणाच्या गोळ्या पेक्षा अर्धा असावा म्हणजे पुरणाच्या पोळीची चव चांगली लागते. नंतर पिठाची छोटी पुरी लाटून त्यात पुरणाचा गोळा ठेवून व्यवस्थित पुरण भरून एक्स्ट्रा असलेले पीठ काढून टाकावं आणि एकदम पातळ अशी पोळी लाटून घ्यावी. त्यानंतर मंद आचेवर पुरणपोळ्या दोन्ही बाजूंनी खमंग परतून घ्याव्यात आणि थंड करत वेगवेगळ्या पसरून ठेवाव्यात. नंतर खमंग तुपावर परतुन गरमागरम सर्व्ह कराव्यात. त्याबरोबर आटीव दुधाचा पेला असेल तर आणखीनच मजा येते. काही लोकांना पुरणपोळ्या साजूक तुपाबरोबर सुद्धा खायला आवडतात.

## वास्तू

### घुबडाची मूर्ती

करोडपती लोक आपल्या घरात घुबडाची प्रतिकृती नक्कीच ठेवतात. घुबडाला लक्ष्मीचे वाहन मानले जाते. असे म्हणतात की घुबडांवर देवी लक्ष्मीचा विशेष आशीर्वाद असतो, म्हणूनच श्रीमंत लोक घरात घुबडाची मूर्ती ठेवतात. यामुळे उत्पन्न झपाट्याने वाढते आणि मालमत्ता खरेदी केली जाते.

## सल्ला

जर तुमचे कपडे थोडेसे ओले असतील तर ते शक्य तितक्या लवकर सुकविण्यासाठी तुम्ही हेअर ड्रायर वापरू शकता. यामुळे कपड्यांचा घाण वासही निघून जातो.

## सौंदर्य

बिटाचा रस ओठांवर लावल्यास ओठ लाल होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ जून २०२५

**योगिनी (स्मार्त) एकादशी, दक्षिणायनारंभ, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, अश्विनी १९।५०, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** तुम्ही शेजारच्या वादात पडणे टाळले पाहिजे, अन्यथा तुम्ही अडचणीत येऊ शकता.

**वृषभ :** जर तुम्हाला बऱ्याच काळापासून कोणतीही चिंता सतावत असेल तर तीही आज दूर होईल.

**मिथुन :** जुन्या चुकांमधून काही धडे घ्यावे लागतील. आजचा दिवस सकारात्मक परिणाम घेऊन येईल.

**कर्क :** मित्रांसोबत मजा करण्यात वेळ घालवाल. तुमच्या जोडीदाराच्या पाठिंब्यामुळे आणि सहवासामुळे तुम्ही आनंदी व्हाल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य राहणार आहे. तुमचा आत्मविश्वास वाढल्याने तुमचे मन आनंदी राहील. कामाच्या ठिकाणी नवीन गोष्टी शिकाल.

**कन्या :** कामाची चिंता वाढेल. तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत काही बदल करू शकता.

**तूळ :** वाढत्या खर्चाची काळजी वाटत असेल तर तुम्ही वडिलधाऱ्यांशी बोलू शकता.

**वृश्चिक :** कारण नियोजन न करता अचानक काम करायला गेल्यास ते काम होणार नाही.

**धनु :** बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. व्यवसायात इतरांवर अवलंबून राहू नका.


**मकर :** कोणतेही व्यवहार जपून करा. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे बोलणे खावे लागेल.

**कुंभ :** आर्थिकबाबतीत बचत करणे योग्य राहील. समाजसेवा करताना भान ठेवा. घरगुती वातावरण बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**मीन :** मुलांचे लाड करा, पण शिस्त बिघडू देऊ नका. महिलांसाठी आपले मत इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२०३ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) एक फळ ४) सुसंगत नसलेले ८) बागकाम करणारा; माळी १०) खिडकी; झरोका; वातायन ११) खलबत; विचारविनिमय १३) नवीन; नूतन १४) तुलना; बारा राशींपैकी एक १५) निवारण करणारा १७) महसूल; संपूर्ण; कर १८) फळातील रसाळ भाग; मगज १९) निस्तेज; पांढरे चक्क २१) कुस्तीगीर; पहिलवान २२) त्रास; वेदना; परेशानी

**उभे शब्द : -** १) आकाश; गगन; नभ २) खोगीर; पलाण ३) एकेक बाब घेऊन ५) साथ; सोबत; बरोबर ६) एक जंगली प्राणी; रानरेडा ७) ऐतिहासिक विद्यापीठ असलेले एक शहर जे ठिकाण आता पाकिस्तानात आहे ९) फळातील किंवा उसातील द्रव १२) पायाने केलेला प्रहार; लाथ १३) पलंग विणण्याची कापडी पट्टी १४) तुरीच्या पिकाचे धाट १५) देखरेख १६) अगदी गरीब; निर्धन १७) टापटीप; चकपक २०) शोध; पत्ता; ठावठिकाणा २१) निवडणुकीत याचे दान करतात

शब्दगंध क्र. ७२०२ चे उत्तर



फिल्मीचक्कर क्र. ११९३ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** ज्ञानानंतर अहंकार जन्म घेत असेल, तर ते विष आहे परंतु ज्ञानानंतर जर नम्रता जन्म घेत असेल तर अमृत आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### इंटरनेट युगाचा विकास कसा झाला?

१९८६ साली २३०८, १९९० साली ३१३००० आणि २०१५ साली सुमारे ३.२ अब्ज लोक. ४० वर्षांत इंटरनेटच्या वापरात झालेली वाढ चक्रावून टाकणारी आहे. शाळेत 'इंटरनेटची तोंडओळख' असा तास अनेकांना आठवत असेल. लँडलाईन फोनवरून मिळणारं डायल-अप कनेक्शन, मग ते सुरू असताना फोन एंगेज्ड असणं, इंटरनेट एक्सप्लोररचं होमपेज उघडण्याची वाट पाहत बसणं आणि आता क्षणार्धात अख्खी फाईल डाऊनलोड करून देईल असं 4G नेटवर्क असा इंटरनेटचा सुपरसॉनिक प्रवास आहे.

सोशल मीडिया असो, बँकेचे व्यवहार असोत किंवा प्रवास, सिनेमाची तिकिटं, अगदी सलूनमधली अपॉइंटमेंट का असेना. सगळ्या गोष्टी घरबसल्या इंटरनेटवरून करता येतात.

मोबाईल फोन्सवर इंटरनेट आल्यामुळे ते कानाकोपऱ्यात पोचलं. स्मार्टफोन आल्यापासून इंटरनेट नसलेला फोन वापरणारी माणसं विरळाच.

या सगळ्या यंत्रांनी, वस्तूंनी आपल्या आयुष्यात असं अढळ स्थान निर्माण केलं आहे की, त्या नसत्या तर आपलं काय झालं असतं, याची कल्पनाच केलेली बरी. आणखी काय संशोधनं होतील आणि या वस्तू कशा बदलतील हे येणारा काळच सांगेल.

विज्ञानाची कास धरताना आपल्या प्रगतीमुळे निसर्गाचा ऱ्हास होणार नाही इतकीच खबरदारी आपण घेत राहावी हे महत्त्वाचं.

## 'माझे गुरुदेव!'

स्वामी विवेकानंद हे धर्मप्रसारासाठी सर्व धर्म परिषदेच्या निमित्ताने भारताचे प्रतिनिधी म्हणून शिकागो (अमेरिका) येथे गेले होते. तेव्हा त्यांनी ती धर्मपरिषद श्रोत्यांची मने जिंकून तेथे 'न भूतो न भविष्यति !' असा विलक्षण प्रभाव निर्माण केला. त्यामुळे सनातन हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व पाश्चात्त्यांसमोर प्रभावीपणे आणि समर्थपणे ठसले. त्या वेळी स्वामी विवेकानंदांना तेथील अनेक संस्थांतर्फे व्याख्यानांसाठी निमंत्रणे मिळू लागली. त्यात त्यांनी ज्ञानयोग, भक्तीयोग, कर्मयोग, राजयोग हे विषय प्रभावीपणे मांडले. सर्व श्रोतृवृंद अगदी मंत्रमुग्ध होऊन आणि देहभान हरपून त्यांच्या निरूपणाचा आस्वाद घेत असायचा. या प्रासादिक निरूपणाच्या वलयातून श्रोते जेव्हा भानावर यायचे, तेव्हा त्यांच्या मध्ये पुढील विषय ऐकून घेण्यासंबंधी तीव्र उत्कंठा जागृत होत असे.

एकदा अशाच एका कार्यक्रमाच्या समारोपानंतर उत्कंठित झालेल्या श्रोत्यांनी स्वामी विवेकानंद यांना घेराव घातला आणि तीव्र जिज्ञासेपोटी ते त्यांना प्रश्न विचारू लागले, हे महन् तपस्वी, स्वामी ! आपण हे अलौकिक ज्ञान कुठल्या शाळेत अथवा महाविद्यालयात संपादन केले ? कृपा करून आम्हाला यासंबंधी विस्ताराने सांगाल का ? त्यावर स्वामी विवेकानंद उत्तरले, अवश्य. हे अमूल्य असे ज्ञान मला केवळ माझ्या गुरुदेवांकडूनच प्राप्त झाले आहे. तेव्हा श्रोतृवृंदांनी अधीरतेने प्रश्न विचारला, आपले गुरु कोण आहेत ? स्वामी विवेकानंदांनी सांगितले, तुमची जर या संबंधी ऐकण्याची तीव्र जिज्ञासा असेल, तर आम्ही अवश्य सांगू.'

त्याच दिवशी स्वामी विवेकानंदांच्या विशेष प्रवचनाचे आयोजन केले गेले. प्रवचनाच्या विषयाचे नाव होते, 'माझे गुरुदेव' त्या संबंधी वर्तमानपत्रातून पुष्कळ प्रसिद्धी केली गेली. त्यामुळे कुतुहलापोटी हे व्याख्यान ऐकण्यासाठी अफाट असा जनसागररूपी श्रोतृसमुदाय उपस्थित होता. व्याख्यानाच्या नियोजित वेळी स्वामी विवेकानंद संबोधन करायला जेव्हा व्यासपिठावरील आसंदीवरून उठून उभे राहिले, तेव्हा एकदम नीरव शांतता निर्माण झाली. ते सद्गुरूंसंबंधी बोलण्यासाठी उभे राहिल्यावर उपस्थित असलेल्या अफाट जनसागररूपी श्रोतृवृंदांकडे पाहून त्यांच्या मनात सद्गुरूंविषयी कृतज्ञतेचा भाव दाटून आला. जेव्हा त्यांनी बोलण्यास प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या मुखातून पहिले वाक्य बाहेर पडले, ते म्हणजे 'माझे गुरुदेव !' हे वाक्य अतिशय सद्गदित अशा अंतःकरणाने म्हणजे भावाने ओतप्रोत असलेल्या अवस्थेमध्ये त्यांच्याकडून उच्चारले गेले होते.

त्यांनी भावपूर्ण उच्चारलेल्या वाक्यामुळे त्यांच्या डोळ्यांसमोर साक्षात गुरूंचे रूप उभे राहिले. सद्गुरूंचे रूप साक्षात डोळ्यांसमोर उभे राहिल्याचे त्यांनी अनुभवल्यामुळे त्यांचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून घळाघळा अश्रूधारा वाहू लागल्या आणि अंग रोमांचित होऊन थरथर कापू लागले. त्यामुळे त्यांना १० मिनिटे काही बोलवतच नव्हते. त्यांची ही अवस्था पाहून श्रोते अगदी आश्चर्यचकित झाले. श्रोत्यांच्या आश्चर्यचकित होण्यामागील कार्यकारणभाव अगदी सोपा होता. शरिराला मार लागणे, फार दुखापत होणे किंवा आई-वडील, जवळचे नातेवाईक यांचा मृत्यू यांविना त्यांनी डोळ्यांमधून अश्रूप्रवाह वाहिल्याचे यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे ते सर्व जण अगदी वेड्यासारखे स्वामी विवेकानंद यांच्याकडे पाहू लागले.

'गुरोर्मौनं तु व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः ।'

अर्थ : गुरूंनी शिष्याला केवळ मौनात शिकविले आणि शिष्याने ते केवळ मौनातच ग्रहण केले.

या प्रसंगावरून स्वामी विवेकानंद यांच्यामध्ये त्यांचे सद्गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याविषयी किती अपार भावशक्ती जागृत होती, हे लक्षात येते.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

हर झगड़े और अशांति का एक ही इलाज है और वह है प्रेम । जिसने प्रेम के रहस्य को नहीं समझा, वह कभी भी प्रभु के दरबार में जाने की उम्मीद नहीं कर सकता।

यहीं रूहानियत का आदि और अंत हैं। जो प्रेम की असलियत समझता है और उसकी रोशनी में जीता और कार्य करता है, वह जैसे दो और दो मिलकर चार होते हैं, प्रभु को पा जाएगा।

हाँ, दूसरों की सहायता करना और उनके लिए अच्छे से अच्छा करना ठीक है, पर आप जो करें, उसके फल की परवाह न करें। उसे अवश्य ही अपने सतुगुरु पर छोड़ देना चाहिए। आप उसके प्रति अपने प्रेम को इतना पूर्ण बनाएँ कि आप उसका हाथ हर चीज में देखें और आप दुश्मनी तथा प्रतिशोध की भावनाओं से ऊपर उठ जाएँ । आप उसे हर वस्तु में देखें और याद रखें कि वह सदा आपके सत्थ है, हमेशा आपकी सहायता के लिए तत्पर है, जब भी आप उसे याद करें। और सर्वोपरि, आप यह न भूलें कि उसे कथनी से नहीं, बल्कि करनी से जीता जा सकता है। यदि आप मुझसे प्रेम करते हैं, तो मेरा कहा मानें। यदि आप ऐसा कर सकें; यदि आप अपने अहंकार को जीत लें और इसे सतुगुरु के चरणों में समर्पित कर दें; यदि आप उसे हर कार्य में कार्यरत 'देखें; यदि आप अपने तंग दृष्टिकोण की वास्तविकता को स्वीकार कर लें; यदि आप गंभीरता से लगातार अपने विचारों और कर्मों का निरीक्षण करें और अपनी बुराईयों और कमियों को उखाड़ फेंकें, तो आप केवल स्वयं ही मुक्त नहीं होगें, वरन् औरों को भी ऐसा करने में सहायक होंगे।

मुझे यह जानकर खुशी हुई कि आप भूखी इंसानियत तक प्रेम और सचाई का पाठ पहुँचाकर पवित्र उद्देश्य में हाथ बँटा रहे हैं। मानव जाति की पीड़ाओं के प्रति दया का भाव मन की गंदगी को साफ करता है और हम कृपालु गुरु-शक्ति से निरंतर निकलने वाली दया के प्रति और अधिक ग्रहणशील बन जाते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

यहीं पर वह कोशिकाये हैं जो मेलाटोनिन हार्मोन बनाती हैं। मेलाटोनिन हार्मोन शरीर की किसी भी कारण से हुई क्षति को ठीक करता है। यह जो ध्यान साधना हम करते हैं इस का उद्देश्य दिव्य नेत्र को जगाने का है तथा अनजाने में मेलाटोनिन स्राव करने वाली कोशिकाएं भी जागृत हो जाती हैं। कोई योगी या दिव्य आत्मा है या नहीं उसकी परख मनुष्य की आंखो से होती है। आंखो में रूहानियत है, प्यार है, दया है, शांति है, अपनापन है तो समझा जाता है कि यह योगी है। ये संकल्प मेलाटोनिन हार्मोन पैदा करने वाली कोशिकाओं को बल देते हैं।

अगर आंखो में क्रोध है, प्रतिशोध है, दुःख है, परेशानी है, नाराजगी है, चंचलता है, लाचारी है तो समझा जाता है यह सिर्फ नाम का योगी है। ऐसी दशा में मेलाटोनिन पैदा करने वाली कोशिकायें कमजोर होती हैं। श्री गुरु नानक देव जी की आंखो में बहुत रूहानियत थी। वह जिस को भी देखते थे वह लोग बदल जाते थे। उन्होंने कौड़ा नामक राक्षस (बुरे व्यक्ति) पर सिर्फ दृष्टि डाली थी। जिस से वह बुरे रास्ते से हट गया। उनकी जिस किसी पर नजर पड़ती थी वह उनके के शिष्य बन जाते थे। विश्व के धर्म पिताओं की दृष्टि में बहुत बल था। वह जिन पर नजर डालते थे वह लोग बदल जाते थे या उनको दिव्य साक्षात्कार होते थे।

जिस से वह लोग उनके शिष्य बन गये। सिर्फ दिव्य दृष्टि के बल से उन्होने अपने अपने धर्म की स्थापना की। गुरु गोरखनाथ के एक विरोधी ने उन पर किसी घातक हथियार से आक्रमण करने के लिये हथियार पकड़ कर हाथ ऊपर उठाया। तब गुरु गोरख नाथ की उन पर नजर पड़ गई तो उस का हाथ ऊपर हवा में ही रह गया। वह हाथ नीचे ना हो। उसे बहुत तकलीफ होने लगी तब किसी ने उसे समझाया कि गुरु जी से माफी मांगो। उन्होने माफी मांगी तो उन का हाथ नीचे हुआ। मदर तरेसा एक नामी व्यक्ति से दान लेने गई तो उसने कहा हाथ फैलाओ दान देता हूं।

मदर ने हाथ फैलाया तो उस व्यक्ति ने हाथ पर थूक दिया। मदर ने उस को प्यार से देखा और कहा यह थूक मेरे लिये है, मेरे बच्चों के लिये क्या देगा ? मदर की आंखो में बहुत करुणा थी, उस व्यक्ति का दिल बदल गया और मदर को एक खाली चेक दिया और कहा इस में जितनी राशि चाहो भर लो। इस दिव्य नेत्र के जागृत होने पर मनुष्यों के दुख एक पल में खत्म कर सकेंगे।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मालक : मी तुला १२ वाजता फोन केला होता. तुझ्या बायकोने सांगितले की तू स्वयंपाक करतो आहेस. मग, स्वयंपाक झाल्यावर तू मला फोन का नाही केलास ?

नोकर : सर, मी केला होता, मॅडमनी सांगितले, तुम्ही भांडी घासत आहात

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या राज्यातील अभय सहायेश्वर मंदिराला युनेस्को आशिया पॅसिफिक ॲवार्ड २०२४ ने सन्मानित करण्यात आले आहे?

– तामिळनाडू

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**शाळेतील बालिकेचा आहार :** तीन ते नऊ वर्षे वयांतील मुलींची शारीरिक व मानसिक वाढ झपाट्याने होते, म्हणून रोज रात्री दोन बदाम, दोन खारीक, चार-पाच काळे मनुके भिजत घालावेत व सकाळी उठल्यावर खाण्यास द्यावेत. यामुळे तिच्या शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण चांगले राहील व पोट साफ होईल. या काळात प्रथिने, जीवनसत्त्वे, कार्बोहायड्रेट्सनी युक्त समतोल आहार द्यावा. पालेभाज्या, फळभाज्या, मोड आलेली कडधान्य, दूध, साजूक तूप, ताक, ऋतूंमधील फळे, राजगिरा, गूळ-शेंगदाण्याचे, नाचणीचे लाडू इत्यादींचा आहारात समावेश करावा. मुलींना रोजरोज भाजी-पोळी खाण्याचा कंटाळा येतो. अशा वेळी मोड आलेले कडधान्य, पालेभाज्या उदाहरणार्थ, लाल माठ, पालक, मेथी, राजगिरा, तांदुळजा यांचे विविध सकस व स्वादिष्ट पदार्थ द्यावेत. मांसाहार असल्यास उकडलेले अंडे, मासे, चिकन आठवड्यातून दोनदा द्यावे. या सर्व पदार्थांमुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण चांगले राहते.

### बालकांचे आजार

**अभ्यंग :** बालिकेच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी पहिली दोन वर्षे रोज तेलाचा अभ्यंग करावा. त्यामुळे शारीरिक थकवा दूर होऊन झोप चांगली लागते व स्नायू बळकट होतात. याकरिता आयुर्वेदिक औषधांनी सिद्ध केलेले बलायुक्त तेल वापरावे. त्यानंतर वयाच्या नऊ वर्षांपर्यंत आठवड्यांतून एकदा सुट्टीच्या दिवशी अभ्यंग करून स्नान घालावे. अभ्यंग स्वत: आईने किंवा जाणकार व्यक्तीने करावा.

**स्नान :** बालिकेला सोसेल अशा कोमट पाण्याने स्नान घालावे. जुन्या काळातील काही स्त्रिया अंघोळीच्या वेळी बालिकेचे स्तन पिळतात. स्तन पिळल्याने गाठी होणे, पू तयार होणे या समस्या उद्‌भवू शकतात. यामुळे जंतुसंसर्ग होऊन थंडी, ताप येऊ शकतो. त्यामुळे लहान बालिकेचे स्तन कधीच पिळू नयेत.


(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जिल्ह्यातील अपघात प्रवण स्थळे शोधून कायमस्वरुपी उपाययोजना करा

**जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांचे निर्देश**



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया.

नगर – जिल्ह्यात रस्ते अपघातामध्ये अनेक व्यक्ती मृत्युमुखी पडतात. या अपघातांचे प्रमाण कमी होण्यासाठी जिल्ह्यातील अपघात प्रवण क्षेत्र शोधून तज्ज्ञांच्या साहाय्याने त्याचे सुरक्षा परिक्षण करत त्याठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.आशिया बोलत होते.

बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, एस.आर. वर्पे, विजय कोटेचा, सहायक अधीक्षक अभियंता एस.डी. शेळके, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे, उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, वसंत पंदरकर, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, अभिजीत पोटे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी होऊन सुरक्षित प्रवासाच्यादृष्टीने अपघातप्रवण स्थळी संबंधित विभागांनी समन्वय साधत तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातून पंढरपूरकडे अनेक दिंड्यातून वारकरी पायी चालत जातात. या सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. ज्या ठिकाणी खड्डे पडले असतील ते बुजवण्यात यावेत. अहिल्यानगर शहरासह इतर ठिकाणच्या उड्डाणपूल अथवा अपघातप्रवण स्थळांची पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग व परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करण्यात यावी. उपलब्ध आकडेवारीनुसार ज्या ठिकाणी अधिक अपघात होतात त्याठिकाणी अधिक प्रमाणात लक्ष देत ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह, रिफ्लेक्टर, हेल्मेट आदींची तपासणी करण्यात यावी. अपघातस्थळी पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग व परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन झालेल्या अपघाताचे विश्लेषण करत त्याची तंतोतंत माहिती आरडीएवर भरण्याच्या च्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी विनापरवानगी गतीरोधक उभारण्यात आले आहेत. या गतीरोधकांमुळेही अनेकवेळा अपघात घडतात. त्यामुळे विनापरवानगी उभारण्यात आलेले गतीरोधक काढण्यात यावेत. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्याच ठिकाणचे गतीरोधक ठेवण्यात यावेत. गतीरोधकाच्या ठिकाणी रिफलेक्टर, बोर्ड आदी बसविण्यात यावेत. रस्त्यावरील दिशादर्शक फलकावर कुठल्याही प्रकारच्या राजकीय जाहिराती, शुभेच्छा संदेश दिसणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

अनेकवेळा बसस्थानकामध्ये खासगी वाहने उभे केल्या बस वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा खासगी वाहनांवर कारवाई करण्यात यावी. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. जिल्ह्यातील बंद टोलनाके काढून टाकण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

# घर आणि संघटनेसोबतच निसर्गही जपणार; उच्च शिक्षित तोडमल नवदाम्पत्याचा निर्धार



उच्चशिक्षिक नवदाम्पत्याने लग्न सोहळ्यात सत्कार समारंभ आणि मानपानाचा खर्च टाळून डोंगरात वास्तव्यास असलेल्या मोर, हरिण आणि इतर प्राण्यांसाठी पाणवठ्यांवर टँकरद्वारे पाण्याची सोय केली आहे.

नगर – नुकतेच हैदराबादजवळील कांचा गचिबोवली येथे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाली आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणा सरकारला फटकारले आणि वृक्षतोड थांबवण्याचे निर्देश दिले. या घटनांचे व्हिडिओ पाहून समाजमनातून हळहळ व्यक्त करण्यात आली. याच अनुषंगाने अहिल्यानगर शहरातील स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल आणि शिवतेज इलेक्ट्रिकलच्या संचालिका ऋतुजा जानवळे या उच्च शिक्षित नवदाम्पत्याने २४ एप्रिल रोजी स्वतःच्या झालेल्या लग्न सोहळ्यात सत्कार समारंभ आणि मानपानाचा खर्च टाळून जेऊर परिसरातील डोंगरात वास्तव्यास असलेल्या मोर, हरिण आणि इतर प्राण्यांसाठी पाणवठ्यांवर टँकरद्वारे पाण्याची सोय केली आहे. या दोघांनाही निसर्ग भ्रमणाची आवड आहे; त्यामुळे आम्ही सुद्धा निसर्गाच देण लागतो असे म्हटले. नव्याने सुरू होत असलेल्या संसारात आम्ही घर तर सांभाळूच सोबत संघटना आणि निसर्ग जपणार आहोत असे दोघांनी म्हटले आहे.

यशवंत तोडमल आणि ऋतुजा जानवळे या दोघांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे; त्यामुळे आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी कसा होईल याचाही ते दोघे विचार करत आहेत. सोबतच या दोघांनी स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या कामासाठी ३१ हजारांची मदत संघटनेचे खजिनदार सागर कराळे यांना सुपुर्द केली आहे. सर्व स्तरातून या उपक्रमाबद्दल नवदाम्पत्याचे कौतुक होत आहे.



भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत राजमाता जिजाऊ यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

# राजमाता जिजाऊ यांना पुण्यतिथीनिमित्त भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत अभिवादन

नगर – भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेत राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊंचे कार्य, विचार व त्यागमय जीवनकार्याची माहिती देत त्यांच्याबद्दल अभिमान बाळगण्याची प्रेरणा देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने करण्यात आली. यावेळी तुझ्या धाडसाचे धडे आम्हाला, तुझ्या विचारांचे धडे सोबतीला! गाजवू शौर्य आम्ही, जिजाऊ माऊली गे... या जाज्वल्य गीत देखील सादर करण्यात आले. या भावपूर्ण गीताने उपस्थितांचे मन भारावून गेले. राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभिवादन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे, सहशिक्षिका सुरेखा वाघ, शितल आवारे, अहिल्या सांगळे, योगिता वाघमारे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सरिता ढवण यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल आवारे यांनी केले.

आभार सुरेखा वाघ यांनी मानले.

# ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक समन्वयातून व्हावी

**अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांचे प्रतिपादन; अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक**



ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक शैलेश हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

नगर – ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक समन्वयातून व्हावी. पावसामुळे रस्त्यावर उन्मळून पडलेली झाडे, विद्यूत पोल आदी तातडीने हटविण्यात यावीत. नागरिकांना विद्युत विषयक असलेल्या समस्यांची तक्रार करण्यासाठी २४X७ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित राहील, याची दक्षता घ्यावी. विद्यूत विषयक दुरुस्तीचे कामे प्राधान्याने करण्यात यावीत. नागरिकांना जारच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणीबरोबरच फळे पिकवण्यासाठी रसायन वापराच्या तक्रारीच्या अनुषंगाने फळे विक्रेत्यांची तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सुचनाही अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी दिल्या. सेतु सुविधा केंद्रातून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा योग्य आहेत काय, त्यासाठी आकारला जाणारे फिस दिली जाणारी सेवा याच्या तपासणीसाठी लवकरच अभिप्राय कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक शैलेश हिंगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. बैठकीस उपजिल्हाधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त सो.ह इंगळे वैधमापनशास्त्र विभागाचे उप नियंत्रक रमेश दराडे उपस्थित होते. बैठकीत अहिल्यानगर शहरात गुटख्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई, प्रत्येक सेतू सुविधा केंद्राच्या दर्शनी भागात दरसूची लावणे, आरोग्यासाठी हानीकारक असलेले प्लास्टिक कप, ग्लासचा वापरावर निर्बंध व जागृती करणे, भेसळयुक्त पनीर विक्री करणाऱ्यांवर कारवाई, ऊर्जामित्र बैठकीचे आयोजन, पेट्रोल पंपावर नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविणे, शासकीय दवाखान्यातून मोफत औषध पुरवठा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीस विविध विषयांवरील चर्चेत अशासकीय सदस्य अतुल कुऱ्हाडे, विलास जगदाळे, प्रा. अमिता प्रीतमसिंग रानू–कोहली, दिनेश थोरात, अशोक शेवाळे, रणजित श्रीगोड, उमा मेहेत्रे, गजेंद्र क्षीरसागर, बाबासाहेब भालेराव, डॉ. कळमकर राजेंद्र पर्वती, प्रा. डॉ. मंगला भोसले, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. विलास सोनवणे, डॉ. गोरख बारहाते, प्रकाश रासकर, रभाजी सुळ यांनी सहभाग घेतला.

# अहिल्यानगरच्या घुले पाटील महाविद्यालयात बी.एस्सी (डेटा सायन्स) व एम.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स) नवीन अभ्यासक्रमांना मान्यता



घुले पाटील महाविद्यालय अहिल्यानगरची सुसज्ज इमारत.

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव, अहिल्यानगर येथे अभ्यासक्रम – विज्ञान व तंत्रज्ञान–बी.एस्सी (डेटा सायन्स), विज्ञान व तंत्रज्ञान – बी.एस्सी (बॉटनी) व विज्ञान व तंत्रज्ञान–एम.एस्सी (कम्प्युटर सायन्स) या नवीन अभ्यासक्रमांना मान्यता महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : मान्यता २०२५/ई–११४३३२९ शैक्षणिक वर्ष–२०२५–२६ पासून नवीन कोर्स अभ्यासक्रम/विषय मान्यता मिळाली असून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

नवीन अभ्यासक्रमांना मान्यता मिळाल्याबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र घुले पाटील, संस्था सचिव चंद्रशेखर घुले पाटील, संस्था विश्वस्त डॉ.क्षितिज घुले पाटील यांनी प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांचे अभिनंदन केले.

नवीन बी.एस्सी (डेटा सायन्स) अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ विज्ञान शाखेतील परीक्षा गणित विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सध्याच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात चांगला रोजगार प्राप्तीसाठी हा चांगला कोर्स/अभ्यासक्रम आहे. तरी सदर नवीन अभ्यासक्रमास अहिल्यानगर शहर, एम.आय.डी.सी.औद्योगिक वसाहत व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या नवीन कोर्सला प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.के.पंदरकर यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा किंवा आपण ९९६०२७७२०१ या मोबाईल नंबरवर संपर्क करावा. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार नवीन सुरू करण्यात आलेल्या कोर्स तसेच हे महाविद्यालय सन २००९ स्थापनेपासून बी.एस्सी, कॉम्प्युटर सायन्स, बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी (केमिस्ट्री) विषयांना पूर्वीपासून मान्यता आहे.



स्नेहबंध फाउंडेशनच्यावतीने महाराष्ट्र गौरव पुरस्काराने तुषार घाडगे यांना सन्मानित करण्यात आले. (छाया – विजय मते)

# महाराष्ट्र गौरव पुरस्काराने ज्योतिषाचार्य तुषार घाडगे सन्मानित

नगर – स्नेहबंध फाउंडेशन आयोजित महाराष्ट्र गौरव पुरस्काराने भिंगार येथील ज्योतिषाचार्य तुषार घाडगे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक डॉ.उद्धव शिंदे, अमित खामकर, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, शिल्पकार प्रमोद कांबळे, पूनम घाडगे आदी उपस्थित होते.

भिंगार येथील ज्योतिषाचार्य तुषार घाडगे गेल्या ३५ वर्षापासून ज्योतिष विशारद म्हणुन काम करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना ज्योतिष विशारदमध्ये महामेरू, शिरोमणी, तिलक, एस्ट्रो आयकॉनिक असे पुरस्कार मिळालेले आहेत. इंदोर येथे आशिया टॉप टेन हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. या सर्वांची दखल घेऊन फाउंडेशनने महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले. आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन सपत्नीक घाडगे यांचा गौरव करण्यात आला.

# सुरेश जोशी यांच्या निवासस्थानी २२ जूनला नीलफलकाचे अनावरण

**रसिक ग्रुपचा उपक्रम**




नगर – थोर इतिहास संशोधक व ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे माजी कार्यकारी विश्वस्त स्व.सुरेश जोशी यांच्या आगरकर मळा येथील निवासस्थानी रसिक ग्रुपच्या वतीने निलफलक लावण्यात येणार आहे. २२ जून रोजी सकाळी १० वाजता आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते व महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली नीलफलकाचे अनावरण होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष जयंत येलूलकर यांनी दिली.

अहिल्यानगर शहरामध्ये विविध क्षेत्रात योगदान देऊन नगरचे नावलौकिक वाढवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या निवासस्थानी ग्रुपच्या वतीने नीलफलक लावण्यात येतात. नगर शहरातील अनेक नावाजलेल्या व्यक्तींच्या निवासस्थानी असे निलफलक लावण्यात आले आहेत.

ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त म्हणून सुरेश जोशी यांनी अनेक वर्ष नि:स्वार्थपणे काम करत हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी योगदान दिले होते. देशातील व राज्यातील विविध भागांमधील अनेक दुर्मिळ ऐतिहासिक वस्तू, ग्रंथ, तैलचित्रे त्यांनी नगरमधील वस्तूसंग्रहाच्या माध्यमातून जपले आहेत. सुरेश जोशी यांनी जपलेला हा ऐतिहासिक वस्तूंचा वारसा आजही नव्या पिढीस मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. त्यांनी या क्षेत्रात दिलेल्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करून येणाऱ्या पिढीला त्यांच्या कार्याची माहिती कळावी यासाठी रसिक ग्रुपच्या वतीने आगरकर मळा येथील पाण्याच्या टाकी जवळील त्यांच्या निवासस्थानी निलफलक लावून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे, असे जयंत येलुलकर यांनी सांगितले.

२२ जून रोजी होणाऱ्या नीलफलक अनावरण समारंभास महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे, ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ.रवींद्र साताळकर, चंद्रशेखर जोशी व महेश जोशी प्रमुख आदी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाच्या जडणघडणीत योगदान देणारे नारायण आव्हाड व आनंद कल्याण यांच्या प्रतीही कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

# १० वी नंतर पारंपारिक शिक्षणापेक्षा नवीन पर्याय – एम.सी.व्ही.सी.

**(व्होकेशनल – सायन्स) टेक्निकल / अर्ध वैद्यकीय अभ्यासक्रम – ११ वी व १२वी**

नगर – १० वी मध्ये कमी गुण मिळाले किंवा ए.टी.के.टी. मिळाले तर प्रत्येक पालकांना व विद्यार्थ्यांना प्रश्न पडतो की आता १० वी नंतर पुढे काय ? कोणती शाखा निवडायची हा प्रश्न रात्रंदिवस सतत भेडसावत असतो. केंद्रशासनाने संपूर्ण भारतात व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड केली. जे आपण ११ वी प्रवेश बरोबर करु शकता. अशा अभ्यासक्रमाची गरज संपुर्ण जगाला वाटु लागली आहे. हे अनेक पालक व विद्यार्थ्यांना माहिती नाही. नगर शहरातील जीवन ज्योत मेडिकल फॉउंडेशन बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, वनविभाग मागे, नगर–औरंगाबाद रोड, अहमदनगर ही संस्था शासन मान्यता प्राप्त असुन २६ वर्षापासुन कार्यरत आहे. पारंपारीक शिक्षणापेक्षा नवीन पर्याय विद्यार्थ्यांना देण्यासाठी मागील दहा वर्षांपासून जीवन ज्योत महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमाची स्थापना करण्यात आली आहे. या विद्यालयामध्ये तीन विविध व्यावसायिक टेक्निकल / अर्धवैद्यकिय अभ्यासक्रम सुरु झाले आहे. १) कॉम्प्युटर टेक्निक्स २) मेडिकल लॅब टेक्निशियन ३) रेडीओलॉजी टेक्निशियन हे अभ्यासक्रम १० वी पास/ए.टी.के.टी. विद्यार्थी / विद्यार्थीनींना मराठी किंवा इंग्रजीच्या माध्यमाव्दारे अल्प मुदतीत अल्प खर्चात पुर्ण करता येतो. तसेच हे अभ्यासक्रम पुर्ण करून १२ वी बोर्डाची परिक्षा देता येते. हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यावर १२ वी ची पात्रता व व्यावसायीक प्रमाणपत्र आणि रोजगार स्वयंरोजगार करणे, तसेच शासकीय निमशासकिय किंवा खाजगी नोकरीची पात्रता व संधी व उच्च शिक्षणासाठी पात्र १) एफ. वाय. बी. ए., एफ. वाय. बी. कॉम. किंवा एफ. वाय.बी.एस्सी विद्याशाखेला प्रवेश घेता येतो. २) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसाय शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी मिळते. ३) सुशिक्षित बेराजगारांसाठी बीजभांडवल सहाय्य योजना अंतर्गत उत्तीर्ण उमेदवारांना सुलभ अर्थसहाय्य मिळु शकते. ४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने या अभ्यासक्रमांना संलग्न असे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरविले आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक्स व हार्टीकल्चर या पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रवेश दिला जातो. ५) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमात द्वितीय वर्षात प्रवेशासाठी जागा राखीव. ६) प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात/ उद्योगांच्या ठिकाणी प्रत्यक्ष कामाच्या जागी प्रशिक्षणाची सोय. ७) महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक दि. ३१ जुलै २००९ अन्वये १२वी (व्होकेशनल) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना डी.एड कोर्स न करता शिक्षक म्हणुन नोकरीची सुवर्ण संधी आहे. ८) मागासवर्गीय अनुसुचित जाती–जमाती, व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती. ९) रोजगारसाठी मार्गदर्शन व सहाय्य. १०) एज्युकेशन लोनची सुविधांचे मार्गदर्शन.

जर आपणास व्यवसाय करायचा असल्यास व्यवसाय करता येतो. जर आपणास शिकाऊ उमेदवारी (अॅप्रेंटिसशिप) करायची असल्यास नामांकीत कंपनी / हॉस्पीटल / लॅबोरेटरीमध्ये करुन नोकरी मिळविता येते. शिवाय स्वयंरोजगार करण्याचीही संधी आहेच. म्हणजे या अभ्यासक्रमाच्या माध्यमातुन आपणास बारावी नंतर योग्य दिशा मिळण्यास मदतच होणार आहे.

अर्ध वैद्यकिय अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर महाराष्ट्र शासनाचे पॅरामेडिकल कौन्सिलमध्ये रजिस्ट्रेशन करता येते. संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शासकिय रुग्णालयामध्ये मेडिकल लॅब टेक्निशियन / रेडीओलॉजी टेक्निशियन हा अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लॅब टेक्निशियन / रेडीओलॉजी टेक्निशियन पदासाठी (पे स्केल रु. ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ५६०० ) भरती प्रक्रिया झाली आहे. थोडक्यात एक चांगला अभ्यासक्रम पुर्ण करण्याची संधी मिळविता येते. तसेच यासाठी वयाची अट नाही. अगदी शासनमान्य अभ्यासक्रमामध्ये हे अभ्यासक्रम उपयुक्त व फायद्याचे आहे. या कोर्समुळे दोन वर्षामध्ये १२ वी सायन्स व स्वतःचे उत्पन्नाचे साधन मिळुन बेरोजगारीवर मात करुन आपले भविष्य उज्वल करु शकता व स्वतःची आर्थिक स्थिती सुधारू शकतात. यामुळे तुमचे राहणीमान उंचावते. तसेच सामाजिक प्रतिष्ठा उंचावून तुम्ही स्वाभिमानाने आजच्या जगात वावरु शकता. सध्याच्या काळात अर्धवैद्यकिय व व्यावसायिक शिक्षण हे अपकमिंग क्षेत्र आहे. मागील पाच–सहा वर्षात अर्धवैद्यकिय व व्यवसायीक क्षेत्राने इतर सर्वच क्षेत्रांना मागे टाकत शिक्षण क्षेत्रात आपली क्रांती केली आहे. इतर कोणत्याही क्षेत्रात शिक्षण घेऊन मोठ्या प्रमाणात खर्च करून वेळ घालुन पुढे नोकरीची संधी कुठेच राहीली नाही. परंतु पॅरामेडिकल व व्यवसायीक हे असे क्षेत्र आहे, ज्या ठिकाणी आज शिक्षणासाठी खर्च कमी असुन मनुष्यबळाची गरज जास्त आहे. परंतु त्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. या क्षेत्रातील रोजगार कोणत्याही क्षेत्रापेक्षा १० पटीने अधिक आहे, त्यामुळे आता विद्यार्थ्यांनी व पालकांनी वेळीच सावध होऊन व आपल्या उज्वल भविष्याचा विचार करुन आजच या क्षेत्राची माहिती घेणे गरजेचे आहे. उपरोक्त पदासाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी. या पेक्षाही अधिक माहीतीसाठी व प्रवेशासाठी संपर्क करावा किंवा समक्ष भेटा. प्राचार्य, जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज, बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, वनविभाग मागे, नगर औरंगाबादरोड, अहमदनगर. मो. ८८३०६८५७३२.

On line admission साठी www.jjmf.info वर भेट द्या.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांची आर्थिक संपत्ती न पाहता, आरोग्य संपत्ती जपत आहे

## डॉ. अशोक लोढा यांचे प्रतिपादन; १२५ रुग्णांची मोफत हृदयरोग तपासणी



श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये राहाता येथील लोढा परिवाराच्या वतीने घेण्यात आलेल्या मोफत हृदयरोग तपासणी शिबिरात १२५ रुग्णांची मोफत हृदयरोग तपासणी करण्यात आली.

नगर – निस्वार्थ आरोग्य सेवेतून आनंदऋषीजी हॉस्पिटलने सेवाभाव जपला आहे. या हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टरांनी आपल्या सेवेतून सर्वसामान्यांना विश्वास व आधार देण्याचे काम केले. हृदयरोगाच्या विविध शस्त्रक्रिया येथे अल्पदरात केल्या जात आहे. रुग्णांची आर्थिक संपत्ती न पाहता, आरोग्याची संपत्ती देण्याचे काम या आरोग्य मंदिरातून घडत असल्याचे प्रतिपादन डॉ. अशोक लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये राहाता येथील लोढा परिवाराच्या वतीने घेण्यात आलेल्या मोफत हृदयरोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. लोढा बोलत होते. याप्रसंगी नरेंद्र लोढा, आनंद लोढा, राजेंद्र लोढा, मंगलताई लोढा, प्रकाश लोढा, धनेश लोढा, परेश लोढा, प्रिया लोढा, रुपाली लोढा, पार्थ लोढा, स्नेहा लोढा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, राहता येथील डॉ. अशोक लोढा यांचेदेखील सेवाभावाने आरोग्यसेवेचे कार्य सुरु आहे. डॉक्टर हा एक देवाचा रुप असल्याची प्रतिमा त्यांनी आपल्या कार्यातून निर्माण केली आहे. गोरगरीबांची सेवा करुन त्यांचे आरोग्याचे प्रश्न सोडविण्याचे काम केले. त्यांचे व्यक्तीमत्व आरोग्य क्षेत्रात नवीन पिढीला सेवाभावी कार्यासाठी ऊर्जा देणारे आहे. आजही त्यांची सेवा अविरत सुरु असून, त्यांच्याकडून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात लागलेला हातभार मोठ्या मदतीपेक्षाही अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अनिकेत कटारिया म्हणाले की, खर्चिक व अद्यावत सर्व आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या एकाच छताखाली उपलब्ध आहेत. अद्ययावत ऑपरेशन थिएटर व तज्ञ डॉक्टरांची टीम २४ तास उपलब्ध असून, सर्वसामान्यांना आरोग्य सेवा दिली जात आहे. देशात हृदयरोग शस्त्रक्रियेसाठी हॉस्पिटलचे नाव देशात नावाजले असून, एन्जोप्लास्टीसाठी वेगळी कॅथलॅब उपलब्ध करण्यात आलेली आहे. दर महिन्याला लहान मुलांपासून तर ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठ्या प्रमाणात हृदयविकाराच्या यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याची त्यांनी माहिती दिली.

डॉ. राहुल अग्रवाल म्हणाले की, जिल्ह्यातील सर्वात जुने व अद्ययावत हार्ट सेंटर म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सुरु आहे. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेतून हृदय शस्त्रक्रिया मोफत होत असले, तरी त्याचा दर्जा उच्चप्रतीचा राखला जात आहे. इंम्पोर्टेड व उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन शस्त्रक्रिया होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरात १२५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरातंर्गत गरजू रुग्णांवर बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व ॲन्जिओप्लास्टी होणार असून, या शस्त्रक्रिया जनआरोग्य योजनेतून मोफत तर अल्पदरात केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.



मुकुंदनगर येथील मोहंमदिया एज्युकेशन सोसायटीच्या मौलाना आझाद उर्दू गर्ल्स हायस्कूलमध्ये विद्यार्थिनींना पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

# मोफत पाठ्यपुस्तके वाटप धोरणाने विद्यार्थ्यांना आनंद

## हसीब शेख यांचे प्रतिपादन; मौलाना आझाद उर्दू हायस्कूलमध्ये पाठ्यपुस्तकांचे वाटप

नगर – सर्व शिक्षा अभियानांतर्गत शासनाने सुरु केलेल्या मोफत पाठ्यपुस्तके वाटप धोरणाने प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना एक वेगळाच आनंद मिळतो. शिवाय काही शाळेतील गोर–गरीब वंचित घटकांना त्याचा लाभ होत आहे, असे प्रतिपादन हसीब शेख यांनी केले.

मुकुंदनगर येथील मोहंमदिया एज्युकेशन सोसायटीच्या मौलाना आझाद उर्दू गर्ल्स हायस्कूल–मध्ये विद्यार्थिनींना पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक प्रा.डॉ. अब्दुस सलाम सर, मुख्याध्यापिका सय्यद फरहाना, शेख नाजेमा, सोलापूरे नाहीद, महागमी अफशा, शेख नाजेमा, सय्यद बहार अंजूम, शेख अब्दुल हसीब, खतीजतुलकुबरा, युनूस खान, शेख यास्मिन, खान मलेकाजहां, खान नफिस अंजुम, शेख मिनाज आदी उपस्थित होते.

हसीब शेख म्हणाले, शासनाच्या उपक्रमा–बरोबरच सामाजिक क्षेत्रात काम करण्याचा विविध संस्थांनी वही,पेन, वाटप केले तर विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित होईल असे सांगितले.

याप्रसंगी प्रास्तविक मुख्याध्यापिका सय्यद फरहाना यांनी केले. खान नफिस अंजुम यांनी आभार मानले.

# शहरातील महिला खेळाडूने मिळवलेले यश कौतुकास्पद

## ज्ञानेश्वर खुरंगे यांचे प्रतिपादन; अनुराधा मिश्रा यांचा जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडून सत्कार



अनुराधा मिश्रा यांनी नॅशनल पॉवर लिफ्टिंग अ‍ॅण्ड डेडलिफ्ट अनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी त्यांचा सत्कार केला.

नगर – शहरातील एका महिला खेळाडूने मिळवलेले यश हे कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले. पॉवर लिफ्टिंगमध्ये महिला खेळाडू दुर्मिळ असून, या खेळात मिश्रा यांनी केलेल्या कामगिरीचे त्यांनी कौतुक केले. तर खेळाडूंना प्रोत्साहन व योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माध्यमातून होत असल्याचे स्पष्ट करुन मिश्रा यांना भावी वाटचालीस त्यांनी शुभेच्छा दिल्या.

शहरातील अनुराधा मिश्रा या महिला खेळाडूने दिल्ली (रोहिणी) येथे झालेल्या नॅशनल पॉवर लिफ्टिंग अ‍ॅण्ड डेडलिफ्ट अनइक्युपेटेड चॅम्पियनशिप स्पर्धेत दोन सुवर्ण पदक पटकाविल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी त्यांचा सत्कार केला.

दिल्ली रोहिणी येथील राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत मिश्रा यांनी ६३ किलो वजनगटात त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन सुवर्णपदकांची कमाई केली. या स्पर्धेत मिश्रा यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांची स्पेन येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

# पद्मशाली महिलांचे नेतृत्व करण्यासाठी सौ.स्वाती सिरसुल यांनी महानगरपालिका निवडणुकीत उभे रहावे : बचत गटाची मागणी



नगर – नगर ऑक्टो. २५ च्या दरम्यान म.न.पा. निवडणूकीत पद्मशाली समाजाच्या वतीने सातभाई गल्ली येथील रहिवासी आणि पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी उभे रहावे असा ठराव १५ जून रोजी झालेल्या पद्मशाली बचत गटाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

पद्मशाली समाज बचत गटाच्या अध्यक्षा सौ. सुनिता कुरापाटी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असता वरील विषय चर्चेला घेऊन निर्णय घेण्यात आला. त्यांची आई सौ. श्यामला बोरा या गेल्या ३०–३५ वर्षे समाज व राजकारणात सक्रीय होत्या. २००१ मध्ये अ. नगर जिल्हा महिला कॉंग्रेसचे अध्यक्षपदावर काम केले असून पद्मशाली समाजामध्ये पंचकमेटी, न्याय कमेटी, तसेच महिलांच्या वैवाहिक जीवनामधील संघर्षामध्ये समुपदेशन करुन सहकार्य केलेले आहे. त्यांनी १९८० पासुन विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्यास प्रत्यक्ष मदत केलेली आहे. त्यांच्या कार्याचा सौ. सिरसुल यांना नक्की फायदा होईल या विचाराने सदर बैठकीत सौ. स्वाती सिरसुल यांना म.न.पा. मध्ये निवडणूकीत भाग घेण्याचा आग्रह करण्यात आला.

नगर शहरामध्ये पद्मशाली समाजाची संख्या मोठी आहे त्या तुलनेने गेले १० वर्षापासून एकही महिला म.न.पा. मध्ये समाजाच्या वतीने नेतृत्व केलेले नाही. विडी कामगार क्षेत्रात पूर्वी अनेक महिला मोर्चा, चळवळीत भाग घेऊन यशस्वीरित्या नेतृत्व केलेले आज राजकारण–समाजकारण कामगार क्षेत्रात पीछेहाट झालेले पहावयास मिळत असल्याची खंत यासभेत अनेकांनी व्यक्त करुन ही पोकळी यावर्षी म.न.पा. निवडणूकीच्या निमित्ताने भरुन काढू असा निर्धार सर्वांनी व्यक्त केला व एकजूटीने निवडून आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

सौ. स्वाती सिरसुल या एका नामवंत पतसंस्थेत गेले १९ वर्षापासून व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रात त्या पदवीधर आहेत. शिवाय त्यांचा तळागाळातील काम करणाऱ्या महिलाशी दांडगा संपर्क आहे. भराडगल्ली, तोफखाना, बागडपट्टी, चितळेरोड परिसर येथे पद्मशाली मतदार मोठ्या संख्येने असून त्यांची मते निश्चित मिळतील अशी अपेक्षा सदर बैठकीत करण्यात आली आहे. सौ. ज्योती बिज्ञा, रुक्मिणी तिरमल, बोज्ञा भाग्यरेखा, इरमल रत्नमाला, पासकंटी पूनम, उपलंची रजनी, पद्मा म्याना, शारदा सुंकी, अंबिका बोगा, लता पुलगम, रेणुका गाली, पौर्णिमा संदुपटला इ. महिलांनी सौ. सिरसुल यांच्याकरिता सक्रिय काम करण्याची तयारी दाखविली त्यामुळे वॉर्ड नं. ९ या भागातुन उभे राहण्याबाबत सौ. स्वाती सिरसुल कितपत तयारी दाखवतील हे लवकरच कळणार आहे.

# सेवाप्रीतच्या स्नेह मेळाव्यात सामाजिक कार्याचा जागर

## सामाजिक प्रकल्प राबविणाऱ्या ग्रुपच्या महिलांचा सन्मान; मुलींचे शिक्षण व महिलांच्या आरोग्यासाठी सेवाप्रीतचा पुढाकार; विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प



सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा स्नेह मेळावा शहरात उत्साहात पार पडला.

नगर – सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा स्नेह मेळावा शहरात उत्साहात पार पडला. मागील वर्षी राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेऊन यापुढे मुलींच्या शिक्षणासाठी व महिलांच्या आरोग्यावर विशेष उपक्रम घेण्याचा संकल्प महिला पदाधिकाऱ्यांनी केला. उत्कृष्ट सामाजिक प्रकल्प राबविणाऱ्या ग्रुपच्या महिला लिडर व सदस्यांना सन्मानित करण्यात आले.

ग्रुपच्या ज्येष्ठ सदस्या तथा मार्गदर्शिका सुशिला मोडक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्नेह मेळाव्याचे उद्घाटन झाले. यावेळी सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, अर्चना खंडेलवाल, सविता चड्डा, डॉ. सिमरन वधवा, स्विटी पंजाबी, अन्नू थापर, रितू वधवा, गितांजली माळवदे, गीता नय्यर, निशा धुप्पड आदींसह महिला सदस्या उपस्थित होत्या.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, सर्व महिलांच्या एकत्रित सामाजिक योगदानाने सेवाप्रीत चालत आहे. प्रत्येक व्यक्तीत परमेश्वराचे रूप असून त्या परमेश्वराची सेवा सेवाप्रीत करत आहे. दिवा स्वतः जळून इतरांना प्रकाश देतो, त्याचप्रमाणे सेवाप्रीतच्या सदस्या स्वतःच्या प्रकाशाने इतरांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. चांगले कर्म करण्याची ईश्वराने जणू एक संधी उपलब्ध करून दिली आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन मुला–मुलींचे भविष्य सुधारून समाज घडविण्याचे कार्य सेवाप्रीतच्या महिला तन–मन धनाने करत असून, मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न बिकट होत असताना त्यांच्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सुशिला मोडक म्हणाल्या की, समाजाप्रती ममताभाव दाखवून सेवाप्रीतच्या महिला सामाजिक संवेदना जपत आहे. त्याग व समर्पण भावनेने सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या कार्यासाठी महिलांनी घेतलेला पुढाकार सामाजिक बदलाचे पाऊल आहे. भावी पिढीत देखील सामाजिक संवेदना जागरुक करुन हे कार्य पुढे घेऊन जावे लागणार असल्याचे त्या म्हणाल्या.

सेवाप्रीतच्या स्नेह मेळाव्यात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक खेळ रंगले होते. विजेत्या महिलांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानिया मुलतानी यांनी केले. आभार डॉ. सिमरन वधना यांनी मानले.

### जिनियस फाऊंडेशन ॲण्ड वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाकडून सेवाप्रीतच्या निःस्वार्थ कार्याची दखल

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला मागील १० वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. त्यांच्या निस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेऊन जिनियस फाऊंडेशन ॲण्ड वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाकडून सन्मान जाहीर करण्यात आला आहे. सेवाप्रीतचे सामाजिक कार्य जागतिक पातळीवर पोहचले असून, जिनियस फाऊंडेशनच्या वर्ल्ड बुकमध्ये त्याची नोंद करण्यात आली आहे.

# सहा.पोलिस निरीक्षक प्रल्हाद गीतेंचा महिला वकीलांनी केला सन्मान



महिला बाल कल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले यांनी पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांचा सत्कार केला.

नगर – नुकतेच झालेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीत नागरिकांचे जीव वाचविणारे आणि अपघात दाखवून कटकारस्थान रचून झालेला खून प्रकरण उजेडात आणणारे नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांचा महिला वकीलांनी सन्मान केला.


महिला बाल कल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले यांनी गीते यांचा सत्कार केला. याप्रसंगी जिल्हा पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, पोलीस निरीक्षक अनंत कोकरे, जगदीश मुंगीर, समीर बारवकर यांच्यासह ॲड. आरती पोखरणा, ॲड.योगिता कोकरे, ॲड. प्रदीप पठारे आदी उपस्थित होते.

ॲड. अनुराधा येवले म्हणाल्या की, पोलीस यंत्रणा म्हणजे खऱ्या अर्थाने समाजाचा तिसरा डोळा आहे. समाजातील दृष्ट प्रवृत्तींना अळा घालण्याचे काम पोलीस यंत्रणेतील कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळे होत आहे. पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी अपघात झाला असल्याचा बनाव करण्यात आलेल्या घटनेचा योग्य तपास लावून तो खून असल्याचे प्रकरण उघडकीस आनले. त्यामुळे सदर युवकासह त्याच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला. या प्रकरणात गीते यांचा तपास महत्त्वाचा ठरला. नुकतेच पुराच्या पाण्यात वाहून चाललेल्या नागरिकांचे जीव त्यांनी वाचवले. ते कर्तव्यदक्ष अधिकारी असले तरी, वर्दीमधील माणुसकी जपणारा अधिकारी असल्याचे, त्या म्हणाल्या.

# खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने नागरदेवळे परिसरात नालेसफाई सुरु



भिंगार – पावसाळा सुरू होऊनही नागरदेवळे भागात नालेसफाई न झाल्याने निर्माण झालेल्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर भिंगार शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष सागर चाबुकस्वार यांच्या पाठपुराव्यानंतर खा. निलेश लंके यांच्या आदेशानुसार येथील ग्रामपंचायतीमार्फत नालेसफाईचे काम सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती चाबुकस्वार यांनी दिली.



सागर चाबुकस्वार

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी या भागात नालेसफाई केली जात होती. मात्र यंदा पावसाळा सुरू होऊन १० दिवस उलटले तरी नालेसफाई झालेली नव्हती. परिणामी, नागरिकांच्या घरगुती ड्रेनेजचे पाणी नाल्यातून वाहून जात नव्हते. त्यातच या नाल्यात विषारी प्राण्यांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. रात्रीच्या वेळेस हे प्राणी खुलेआम फिरताना दिसत असल्याने लहान मुले, महिलांना विशेष धोका निर्माण झाला होता.

या समस्येकडे गांभीर्याने लक्ष वेधत सागर चाबुकस्वार यांनी नुकतीच पारनेर तालुक्यातील हंगा गावात खासदार निलेश लंके यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यानंतर लंके यांनी तत्काळ ग्रामविकास अधिकारी नांगरे यांच्याशी संपर्क साधून तातडीने नालेसफाई करण्याचे निर्देश दिले.

ग्रामपंचायतीनेही त्वरित हालचाल करत नालेसफाईचे काम हाती घेतले असून सध्या हे काम सुरू आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



अंबिका महिला सहकारी बँकेच्या संस्थापक संचालिका स्वर्गीय प्रा. पुष्पाताई मरकड यांच्या पाचव्या महिन्याच्या स्मृतिदिनी अंबिका महिला बँकेच्या मुख्य शाखेत शाखेस आई तुळजाभवानी यांची प्रतिमा देताना वैशाली मरकड, शुभांगी मरकड, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुशराव गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रोहिणी मांडे, लता कळमकर, अपूर्वा खरमाळे व सर्व स्टाफ दिसत आहे.

# शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात २७ जूनपर्यंत योगदिनाचे आयोजन

नगर – आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी जिल्ह्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात येणार असून २० ते २७ जून या कालावधीत योग आणि आरोग्य शास्त्र विषयक ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी रा.दा. शिंदे यांनी दिली आहे.

शासकीय सुट्ट्या वगळता हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ नागरिक, शालेय विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्यासह वाचक सभासदांनी घ्यावा, असेही कळविण्यात आले आहे.

# साहित्यिक व कलाकारांसाठी राजर्षी शाहू महाराज मानधन योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

नगर – राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजने अंतर्गत कला आणि साहित्य क्षेत्रातील योगदान देणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींना दरमहा ५ हजार रुपये मानधन देण्याची योजना जाहीर केली आहे. १६ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना ३१ जुलै पर्यंत राज्य शासनाच्या https://aaplesarkar.gov.in या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचे वय ५० वर्षांपेक्षा जास्त असावे (दिव्यांगांसाठी ४० वर्षे), कला आणि साहित्य क्षेत्रात किमान १५ वर्षांचे सातत्यपूर्ण, दर्जेदार योगदान असावे, ज्येष्ठ, विधवा, परित्यक्ता, आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येईल, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे, केवळ कलेवर अवलंबून असलेले किंवा सध्या इतर कोणतेही उत्पन्न नसलेले कलाकार या योजनेसाठी पात्र आहेत. केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर पेन्शन योजनेत समाविष्ट नसलेले आणि महाराष्ट्राचे रहिवासी असलेले कलाकार पात्र राहतील. या योजनेचा उद्देश कला आणि साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करणे आणि त्यांना आर्थिक आधार देणे हा आहे.

तरी पात्र लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी त्वरित ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## तल्लख मेंदूसाठी अंड्याचा फंडा



'संडे हो या मंडे, रोज खाओ अंडे' हे खरेच आहे. विशेषतः मेंदूच्या आरोग्यासाठी ते लाभदायक ठरते असे दिसून आले आहे. मानसिक क्षमता कमी होणे हे वृद्धत्वाचे सामान्य लक्षण आहे. हे बहुतेक लोकांसोबत घडते. मग ती कमकुवत स्मरणशक्ती असो किंवा मेंदूतील धुके म्हणजे ब्रेन फॉग असो. हा वृद्धत्वाचा परिणाम आहे. मात्र, रोज अंडी खाल्ल्याने मेंदू तीक्ष्ण होऊ शकतो, असे एका नवीन अभ्यासातून समोर आले आहे. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, अंडी वृद्ध महिलांमध्ये मानसिक क्षमता वाढवण्यास मदत करतात. हे आपली भावनिक स्मृती आणि मेंदूची कार्ये सुधारू शकते. जसे की आत्म-नियंत्रण, लवचिकता आणि कौशल्य वापर.

एका नव्या अभ्यासानुसार, अंडी खाल्ल्याने मानसिक क्षमता वाढण्यास मदत होते. एवढेच नाही तर वृद्ध महिलांच्या आहारात अंड्यांचा समावेश केल्यास त्यांची विचार करण्याची क्षमताही सुधारू शकते. अंडी हा प्रथिनांचा चांगला स्रोत आहे, जो तुमची रोजची गरज पूर्ण करू शकतो. त्यात जीवनसत्त्वे आणि खनिजेदेखील असतात. प्रथिनाशिवाय अंड्याचे इतरही अनेक फायदे आहेत. हे मेंदूच्या विकासात आणि एकाग्रतेत मदत करतात. याव्यतिरिक्त, अंड्यांचे सेवन हे हृदयरोगाचा धोका कमी करू शकतात आणि हृदयाचे आरोग्य सुधारू शकतात. अंड्यांमध्ये ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन असतात, जे डोळ्यांसाठी फायदेशीर असतात. वजन कमी करण्यासाठी अंडी खाण्याचाही सल्ला दिला जातो. दिवसातून एक किंवा दोन अंडी खाणे सुरक्षित आहे. मात्र, हे संतुलित आहारासोबत खावे. अंड्यांमध्ये कोलेस्टेरॉल जास्त असते. एका अंड्यामध्ये २०० मिलीग्राम कोलेस्ट्रॉल असते. त्यामुळे ते खाताना हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. यात आपण अंड्याचे पांढरे भाग खाऊ शकता, ज्यामध्ये उच्च प्रथिने असतात आणि चरबी नसते. त्याचवेळी, अंड्यातील पिवळ्या भागामध्ये कोलेस्टेरॉल आणि चरबी जास्त असते. लक्षात ठेवा की, अंड्याचा केवळ पांढरा भागच खाणे हे संपूर्ण अंडे खाण्याइतके आरोग्यदायी ठरत नाही. काही समस्या नसेल तर पूर्ण अंडेच खाणे योग्य ठरते. जर तुम्हाला कोलेस्टेरॉल किंवा हृदयाची समस्या नसेल तर दररोज अंडी खाणे तुमच्यासाठी सुरक्षित आहे, असे तज्ज्ञ सांगतात.

## समुद्रातील सूक्ष्मजीवांबाबत नवं संशोधन




एका लघुग्रहाच्या धडकेने पृथ्वीवर ६.५ कोटी वर्षांपूर्वी डायनासोरसारख्या प्राण्यांसह अनेक प्रजाती नष्ट झाल्या. डायनासोरप्रमाणेच समुद्रातील सरीसृप, अपृष्ठवंशीय व अनेक सूक्ष्मजीवही नष्ट झाले होते, त्याला कारण या लघुग्रहाचा आघात हे मानले जाते. त्यावेळी जगातील समुद्रात मोठे बदल झाले, तरी अगदी खोलवर असलेले काही सूक्ष्मजीव मात्र त्यातून वाचले होते. ते कसे वाचले असावेत याचे कोडेच आहे. या आघातावेळी समुद्रातील सजीवांचे मुख्य अन्न असलेले शैवाल व जीवाणू नष्ट झाले होते. असे असले तरी तळाच्या भागात हे सूक्ष्मजीव जिवंत राहिले, याचे कारण शोधण्याचे प्रयत्न अजूनही चालू आहेत. ब्रिटनमधील कार्डिफ विद्यापीठाच्या संशोधकांनी म्हटले आहे की, सागराच्या वरच्या भागातील शैवाल व जीवाणू नष्ट झाले होते हे खरे असले, तरी त्यांचेच काही प्रकार लघुग्रहाच्या आघातानंतरही टिकून राहिले होते. त्यामुळे सागरी जीवांना तळाशी असतानाही अन्न मिळत होते.

महासागरांमधील काही सजीवांचे जे जीवाश्म आहेत. त्यातील माहितीचे विश्लेषण करून हा उलगडा करण्यात आला आहे. महासागरातील वरच्या भागातून अन्न खालच्या भागात जात होते ते सेंद्रिय द्रव्य होते व अगदी कमी प्रमाणात ते उपलब्ध झाल्यामुळे उल्कापाषाणाच्या आघातानंतरही महासागरातील काही जीव टिकून राहिले होते. या संशोधनात वैज्ञानिकांनी दक्षिण अटलांटिकच्या तळाकडील भागात खोदकाम करून काही जीवाश्म मिळवले आहेत.

आघातानंतर सागरी जीवांची अन्नसाखळी तुटली होती, ती पूर्ववत होण्यास नंतर १७ लाख वर्षे लागली. पण आधीच्या अंदाजानुसार अन्नपुरवठा पूर्ववत होण्यास ३४ लाखांहून अधिक वर्षे लागली असे मानले जात होते. डायनासोर ज्या आघातात मारले गेले त्यात सागरी परिसंस्थाही नष्ट झाली होती. अनेक सागरी सरीसृप प्राणी त्यांची अन्नाची गरज वेगळ्या पद्धतीने भागवत होते, असे कार्डिफ विद्यापीठाचे हिथर बीर्च यांनी सांगितले. त्या काळात अचानक आघात होऊन बहुतांश जीवसृष्टी नष्ट झाली. त्यात प्लॅंक्टन या सागरी वनस्पती नष्ट झाल्या, तरी शैवाल व जीवाणू काही प्रमाणात सागराच्या तळाशी टिकून राहिले. त्यामुळे सागरी तळाशी असलेल्या जीवांना अल्पप्रमाणात का होईना अन्नपुरवठा होत राहिला. असे असले तरी सागराच्या तळाशी असलेला अन्नपुरवठा आणखी सुरळीत होण्यास २० लाख वर्षे लागली, असे बिर्च यांचे मत आहे. अनेक वैज्ञानिकांच्या मते, ६.५ कोटी वर्षांपूर्वी मेक्सिकोच्या युकाटन भागात ११० कि.मी. व्यासाचा लघुग्रह कोसळला होता. या लघुग्रहाच्या धडकेने पृथ्वीवर सूर्याची ऊर्जा येणे बंद झाले व हरितगृह वायूंनी तापमान वाढत गेले आणि जीवसृष्टीचा बराच ऱ्हास झाला होता. इकॉलॉजी या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## मुले कमी, पेटस् जास्त!



एकेकाळी चीन लोकसंख्येबाबत जगात अव्वल स्थानावर होता. दीर्घकाळ या स्थानावर राहिल्यानंतर अलिकडेच त्याचे हे स्थान घसरले व भारत सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनला. चीनने वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी 'एकच मूल' हे धोरण अनेक वर्षे नेटाने व सक्तीने राबवले होते. मात्र, त्याचे दुष्परिणाम दिसू लागल्यावर हे धोरण हटवण्यात आले. सध्या घटत्या लोकसंख्येच्या संकटाचा सामना करणाऱ्या चीनमध्ये लवकरच मुलांपेक्षा प्राण्यांची संख्या अधिक असणार आहे. सीएनएन आणि गोल्डमॅन सॅक्सच्या अहवालानुसार, चीनच्या शहरी पाळीव प्राण्यांची संख्या या वर्षाच्या अखेरीस चार वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांपेक्षा जास्त होईल. कारण, पाळीव प्राण्यांचे पालक मुलांना जन्म देण्याऐवजी पाळीव प्राणी पाळण्याची प्रथा वाढवत आहेत.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात असे म्हटले आहे की, अनेक दशकांच्या 'एकच मूल' धोरणानंतर चीनची लोकसंख्या झपाट्याने वृद्ध होत आहे आणि तेथील कर्मचारी संख्या कमी होत आहे. युथ पॉप्युलेशन रिसर्च इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, मुलाचे संगोपन करण्याच्या बाबतीत चीन हा जगातील सर्वात महाग देश आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्सचा क्रमांक लागतो. चीन सरकारने २०१६ मध्ये 'एक मूल' धोरण संपुष्टात आणले आणि नंतर २०२१ मध्ये तीन मुलांना परवानगी देण्यासाठी जन्म निर्बंध शिथिल केले.

आता चीन जन्मदर वाढवण्यासाठी धडपडत आहे. गोल्डमन सॅक्सच्या अहवालात असे भाकीत केले आहे की, वर्षाच्या अखेरीस चीनच्या शहरी भागात पाळीव प्राण्यांची संख्या चार वर्षांखालील मुलांच्या संख्येपेक्षा जास्त होईल. पाळीव प्राण्यांच्या खाद्यपदार्थांच्या वाढत्या मागणीनंतर ही बाब समोर आली आहे. गोल्डमन सॅक्सचा अंदाज आहे की, २०३० पर्यंत शहरी चीनमधील पाळीव प्राण्यांची लोकसंख्या देशभरात चार वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांपेक्षा जवळपास दुप्पट होईल. हा अंदाज फक्त शहरी भागांसाठी आहे आणि जर ग्रामीण भागांचा समावेश केला तर एकूण पाळीव प्राण्यांची संख्या आणखी जास्त असेल. गोल्डमन सॅक्सच्या मते, चीनमधील तरुण लोकांमध्ये पाळीव प्राणी पाळण्याची प्रचंड क्रेझ आहे. कौटुंबिक वंश चालू ठेवण्याचे साधन म्हणून तरुण पिढ्या यापुढे विवाह आणि मुले जन्माला प्राधान्य देत नाहीत. वाढती महागाई आणि आर्थिक अनिश्चितता अनेक चिनी जोडप्यांना मूल होण्यापासून रोखत आहे. त्यामुळे चीन सरकारने आपला दृष्टिकोन बदलला आहे. लोकांना आई-बाबा होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अनेक आमिषे दाखवली जात आहेत. नसबंदी सारख्या प्रतिबंधात्मक लोकसंख्या नियंत्रण उपायांची जागा आता रोख बक्षीस आणि पालकांची रजा यासारख्या आकर्षक योजनांनी घेतली आहे.

## मूतखडाग्रस्तांनी काय टाळावे?

चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयींसोबतच आपली कमी पाणी पिण्याची सवयदेखील किडनी स्टोन म्हणजेच मुतखडा होण्याचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. किडनी स्टोन झाला असल्यास तुम्ही आहाराची काळजी घेतली तरी तुमच्या समस्या बऱ्याच अंशी सुटू शकतात. किडनी स्टोन झाल्यास कोणत्या गोष्टी सोडाव्या लागतात, जाणून घेऊया! स्टोनच्या रुग्णांनी पुढील गोष्टी टाळाव्यात, अन्यथा तुमचे आजारपण वाढू शकते, असे तज्ज्ञ सांगतात.





**टोमॅटो :** टोमॅटोमध्येही ऑक्सलेटचे प्रमाण भरपूर असते. किडनी स्टोन असलेल्या रुग्णांनी टोमॅटोचे सेवन अजिबात करू नये. तुम्ही टॉमेटो खात असाल, तरी त्याच्या बिया नक्कीच काढा.

**पालक :** जर तुमच्या शरीरात किडनी स्टोन असतील तर पालक या एरवी अतिशय आरोग्यदायी ठरणाऱ्या हिरव्या पालेभाजीपासून दूर राहणे चांगले. पालकसारख्या हिरव्या भाज्यांमध्ये ऑक्सलेट आढळते. पालक खाल्ल्याने ते कॅल्शियम गोळा करते आणि ते लघवीपर्यंत पोहोचू देत नाही. जर तुम्हाला स्टोन असेल आणि तुम्ही पालक खात असाल तर तुमची प्रकृती बिघडू शकते.

**सी फूड आणि मांस :** तुम्हाला सी फूड आणि मांस खाणे आवडत असेल, तुम्ही नियमितपणे हे खात असाल तरी चांगले आरोग्य हवे असेल तर ते तुम्ही वेळीच सोडले पाहिजे. यासोबतच तुम्हाला अधिक प्रथिनयुक्त पदार्थदेखील टाळावे लागतील. या पदार्थांमध्ये प्युरीन नावाचे घटक आढळतात. स्टोनच्या रुग्णाच्या शरीरात प्युरीनचे प्रमाण वाढले, तर शरीरात यूरिक ॲसिडची पातळी वाढू शकते. ज्यामुळे स्टोनचा आकारही वाढू शकतो.





**चॉकलेट :** तुम्हाला चॉकलेट कितीही आवडत असले तरी स्टोन असल्यास चॉकलेटला 'नाही' म्हणावेच लागेल. मुतखडा असेल तर तज्ज्ञ तुम्हाला चॉकलेट सोडून देण्याचा सल्ला देतात. चॉकलेटमध्ये ऑक्सलेटस्? असल्यामुळे स्टोनची समस्या वाढू शकते.




**चहा :** स्टोनचा त्रास आहे, हे कळाल्यापासूनच चहा न पिण्याचा सल्ला दिला जातो. अन्यथा रुग्णाला खूप त्रास होऊ शकतो. चहामुळे स्टोनचा आकार वाढू शकतो.

**ही घ्यावी काळजी**

किडनी स्टोनचे रुग्ण असाल तर पचायला जास्त वेळ जाईल अशा पदार्थांचा जेवणात समावेश करू नका. मांस, मासे, कोल्ड्रिंक्स इत्यादींचे पदार्थांचा विचार करणेही सोडून द्या. फळांमध्ये, स्ट्रॉबेरी आणि प्लम्स तसेच अंजीर आणि मनुका यांसारख्या सुक्या फळांचे सेवन टाळा. दही, चीज आणि लोणी अशा दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन कमी करा. कॅन केलेला सूप, नूडल्स, तळलेले पदार्थ, जंक फूड इत्यादी टाळा. वांगी, मशरूम आणि फ्लॉवर यासारख्या भाज्या टाळाव्यात, यामुळे स्टोनचा त्रास वाढू शकतो.


## गूढ अज्ञात ग्रहाचे



आपल्या ग्रहमालिकेत आठ ग्रह आहेत. मात्र, प्लुटो या बटु ग्रहाखेरीज सौरमालिकेच्या टोकाला, दूरवर एक अज्ञात ग्रहही असल्याचे दीर्घकाळापासून अनेकजण म्हणत आले आहेत. त्याला 'प्लॅनेट एक्स' असे म्हटले जाते. पृथ्वीवरील जीवसृष्टी अनेकदा नष्ट झाली होती, त्यामागे हा अज्ञात ग्रह कारणीभूत होता, असे काही संशोधकांचे म्हणणे आहे. २.७० कोटी वर्षांपूर्वी या ग्रहामुळे पृथ्वीवर धूमकेतूंचा मारा झाला व त्यातून जीवसृष्टी नष्ट झाली असे एका अभ्यासात म्हटले आहे. आपल्या सौरमालेतील या 'प्लॅनेट एक्स'मुळे विशिष्ट कालांतराने जीवसृष्टी नष्ट होण्याच्या घटना घडल्या. हा ग्रह अद्याप शोधला गेलेला नाही, पण त्याच्यातूनच धूमकेतूंचा वर्षाव पृथ्वीवर झाला. दर २.७० कोटी वर्षांनी जीवसृष्टी नष्ट होण्याचे प्रकार घडले, असे या अभ्यासात म्हटलेले आहे.

गेली शंभर वर्षे 'वक' हा नववा अज्ञात ग्रह शोधत आहेत, पण अजून तो सापडलेला नाही. यापूर्वीच्या संशोधनानुसार क्युपर पट्ट्याच्या कक्षीय काळात काही विपरितता दिसली होती. क्युपर पट्टा हा चकतीच्या आकारासारखा असून, त्यात धुमकेतू व इतर लघुग्रह आहेत. तो नेपच्यूनच्या पलीकडे आहे. अमेरिकेतील अरकान्स विद्यापीठातील वैज्ञानिक डॅनियल व्हिटमायर यांनी सांगितले की, 'प्लॅनेट एक्स' हा सूर्याभोवती फिरत आहे, त्याची कक्षा किंचित कललेली आहे व तो संथगतीने फिरतो. क्युपर पट्ट्यातून २.७० कोटी वर्षांनी तो जातो व त्यामुळे पृथ्वीवर धूमकेतू आदळतात. कारण ते या पट्ट्यात आहेत. ते केवळ पृथ्वीवर आदळतात. एवढेच नाही तर सूर्याजवळ येताना सौरमालेसही धोकादायक ठरतात. त्यामुळे पृथ्वीवर येणारा सूर्यप्रकाशही कमी होतो. १९८५ मध्ये जीवाश्म संशोधनाच्या आधारे २.५० कोटी वर्षांपूर्वी धूमकेतूंचा वर्षाव झाल्याचे पुरावे मिळाले आहेत. नवीन संशोधनात हे पुरावे ५० कोटी वर्षांपूर्वीचे आहेत. 'प्लॅनेट एक्स' हा ग्रह पृथ्वीच्या एक ते पाच पट वस्तुमानाचा व सूर्यापासून पृथ्वीपेक्षा १०० पट लांब अंतरावर असावा. या गूढ ग्रहाचा पृथ्वीवरील उत्क्रांतीशी संबंध असल्याचे व्हाइटमायर यांनी सांगितले. 'मंथली नोटिसेस ऑफ द रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## शनी ग्रहावरचे पर्वतराज



नेहमीच खगोलशास्त्रांच्या कुतूहलाचा विषय असतात. शनीला शंभरपेक्षाही अधिक नैसर्गिक उपग्रह म्हणजेच चंद्र आहेत. त्यापैकी टायटनसारखे काही चंद्र विशेष लक्ष वेधून घेत असतात. नासाने शनी व त्याचे चंद्र यांच्या निरीक्षणासाठी कॅसिनी यानाची मोहीम राबवली होती. अनेक वर्षे ही मोहीम राबवल्यानंतर कॅसिनीला शनीवर आदळून नष्ट करण्यात आले होते; मात्र यानाने पाठवलेल्या डाटावर सातत्याने नवे नवे संशोधन होत असते. याच कॅसिनीने शनीच्या टायटन नावाच्या चंद्रावरील सर्वात मोठा पर्वतही शोधून काढला आहे. टायटन या शनीच्या चंद्रावर १० हजार ९४८ फूट उंचीचा पर्वत असून तो मिथ्रिम मॉँटेस पर्वतराजीत आहे.

संशोधकांच्या मते या टायटनवरील सर्वात उंच शिखर हे १० हजार फुटांपेक्षा अधिक उंच आहे. ते सर्वात उंच ठिकाण आहे एवढेच नव्हे तर सर्वोच्च बिंदूही आहे, असे नासाच्या कॅसिनी रडार चमूचे स्टीफन वॉल यांनी म्हटले आहे. टायटनवरील सर्वात उंच पर्वत हे तेथील विषुववृत्तावर आहेत. मिथ्रिम मॉँटेस पर्वतराजीत इतरही काही उंच पर्वत आहेत. तसेच झानाडू नावाचा एक भाग आहे. टायटनची शिखरे आपल्याला त्याच्या उत्पत्तीविषयी माहिती देतात, असे कॅसिनी मोहिमेच्या चमूतील ब्रिगहॅम यंग युनिव्हर्सिटीचे सदस्य जॅनी राडेबॉग यांनी सांगितले. पृथ्वीवरील पर्वत व सुळके हे आतून असलेल्या बलामुळे तयार झालेले दिसतात. हिमालय व अँडीज पर्वत हे अंतर्गत बलामुळे तयार झाले आहेत. कॅसिनी अवकाशयानाच्या संशोधनानुसार टायटनवर पाऊसही पडतो तेथील नद्यांच्या पाण्यामुळे पृष्ठभाग खरवडला जातो. टायटनवर मोठे पर्वत आहेत ही गोष्ट हे निदर्शित करते की, तेथील भूपृष्ठाखालीही थर आहेत ज्यांना टेक्टॉनिक प्लेटस् असे म्हणतात. टायटनचे परिभ्रमण व भरतीची दले किंवा गाभ्याचे शीतकरण अशा अनेक बाबी तेथे आहेत. तेथील बर्फाळ सागरात हे पर्वत कसे तयार झाले असावेत, याचा शोध घेण्याचे काम आता संशोधकांना करावे लागणार आहे.

## ब्रेकफास्टला ब्रेक नको!

*नाश्त्याला इंग्रजीत ब्रेकफास्ट म्हणतात. रात्रीचा उपवास सकाळी मोडणे म्हणजे ब्रेकफास्ट. नाश्त्यामुळे शरीराला ऊर्जा तर मिळतेच पण त्याचबरोबर अनेक पोषक घटकही मिळतात. उत्तम आरोग्यासाठी नाश्ता खूप महत्त्वाचा आहे, असे तज्ज्ञ सांगत असतात. हे माहीत असूनही अनेकजण सकाळचा नाश्ता टाळतात. सकाळी प्रचंड धावपळ असते हे उघड आहे. काहींना ऑफिसला तर काहींना कॉलेजला जावे लागते. अशी परिस्थिती अधूनमधून आली तर हरकत नाही, पण हे रोजच होत असेल तर, तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी. नाश्ता वगळल्याने शरीरात आवश्यक पोषक तत्त्वांची कमतरता निर्माण होऊ शकते. ज्यामुळे तुमचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. जर तुम्ही देखील कोणत्याही कारणास्तव नाश्ता सोडत असाल तर त्याचा तुमच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. चला जाणून घेऊया नेमके काय परिणाम होतात.*



**वजन वाढू लागते**

बहुतांश लोकांना आश्चर्य वाटेल पण, दररोज नाश्ता वगळल्यानेही वजन वाढण्याचा धोका वाढतो. सकाळचा नाश्ता न केल्यावर, तुम्ही दुपारचे जास्त अन्न खाणार. त्यामुळे तुमचे वजन वाढू शकते. त्यामुळे न चुकता नाश्ता करणे गरजेचे आहे.



**रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते**

नाश्ता वगळणे म्हणजे तुमची रोग प्रतिकारशक्ती कमकुवत होणे. रात्रीचे जेवण आणि सकाळचा नाश्ता यामध्ये ७-८ तासांचे अंतर असते. अशा स्थितीत जर तुम्ही सकाळचा नाश्ताही केला नाही तर त्यामुळे पेशींना नुकसान होऊ लागते. त्यामुळे रोगप्रतिकारक पेशींना निरोगी ठेवायचे असेल तर नाश्ता जरूर करा.

**साखरेची पातळी वाढू शकते**

सकाळी नाश्ता न केल्याने रक्तातील साखरेची पातळीत चढ-उतार होते. सकाळी नाश्ता केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते, दिवसाची सुरुवात चांगल्या आणि सकस आहाराने केल्यास मधुमेहाचा धोका कमी होतो आणि त्याच्याशी संबंधित गुंतागुंतीही कमी होते.

**पचनक्रिया मंदावते :** जर तुम्ही सकाळी नाश्ता केला नाही तर त्यामुळे पचनक्रिया मंदावण्यास सुरुवात होते. सकाळचा नाश्ता तुमची पचनक्रिया वाढवते म्हणजेच, जर तुम्ही नाश्ता केला नाही तर पचनक्रिया मंद होईल ज्यामुळे कमी कॅलरीज बर्न होतील आणि पुन्हा तुमचे वजन वाढू लागेल. त्यामुळे वेळेत नाश्ता करणे गरजेचे आहे.

# गुंड प्रवृत्तीच्या लोकांना अटक करण्याच्या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयावर काढला 'आक्रोश मोर्चा'




भिल्ल समाजाचावतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

नगर – कापूरवाडी तालुका अहिल्यानगर येथे १२ जून रोजी आदिवासी भिल्ल समाजातील राजेंद्र हिरामण निकम, अंबिका हिरामण निकम, जयश्री अनिल पवार, प्रतीक अनिल पवार, अनिता गहिनीनाथ जाधव, संदीप हिरामण निकम यांना लोखंडी रोडने लाकडी दांड्याने जिवंत मारण्याच्या हेतूने हाणमार करण्यात आली आहे. ते सध्या अहिल्यानगर सिविल हॉस्पिटल मध्ये ॲडमिट आहेत. त्यातील अनिता गहिनीनाथ जाधव या आदिवासी महिलेची प्रकृती चिंताजनक आहे. तसेच इतरांना देखील गंभीर हाणमार करण्यात आली आहे. त्यामुळे भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे या आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे, ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३५२, ३२४(४), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक अधिनियम १९८९ प्रमाणे. ३ (१), ३(१)(s), ३(२) (va) कलमान्वये गुन्हे दाखल आहेत. परंतु राजकीय संरक्षणापोटी त्यांना अद्याप अटक झालेली नाही.

भिल्ल समाजावर गावातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी प्राणघातक हल्ला केला आहे. या आरोपींना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी एकलव्य आघाडी महाराष्ट्र राज्य, वंचित आघाडी, तसेच भिल्ल समाजाचावतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. याप्रसंगी एकलव्य आघाडी महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष अनिल जाधव, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, उत्तर जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, पत्रकार अशोकराव तांबे, कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष मनोज साळवे, आरपीआयचे सुशांत म्हस्के, एम आय एम चे जिल्हाध्यक्ष डॉ.परवेज अशरफी शेख, वंचित तालुका अध्यक्ष राहुरी संतोष चोलखे, भारतीय बौद्ध महासभेचे अण्णासाहेब गायकवाड आदी उपस्थित होते.

संबंधित आरोपींचे रेकॉर्ड गुन्हेगारीचे आहे. याच आरोपींनी कापूरवाडी गावात मुस्लिम समाजावर प्राणघातक हल्ला केला म्हणून हिंदू मुस्लिम दंगलीचे (HM) गुन्हे देखील दाखल आहे. हे कापूरवाडी गावात अनाधिकृत मुरूम व खडीचा व्यवसाय करतात. या गावामध्ये वनीकरणाच्या जागेत अनधिकृत खडी क्रेशर आहेत. वनविभागाच्या जागेवर यांचा अनधिकृत कब्जा आहे. हे वनविभागाच्या जागेत दलित, आदिवासी समाजातील कुटुंबांना निवासासाठी राहू देत नाहीत. त्यांना दादागिरी करून दमबाजी करतात. असा प्रकार गावात चौकशी केली असता आढळून आला आहे. त्यामुळे संबंधित आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक केली नाही तर ते पिडीतांना धमकाऊ शकतात व पुरावा नष्ट करू शकतात. त्यामुळे पोलीस अधिक्षक यांनी आरोपींना ताबडतोब अटक करण्याचे आदेश द्यावेत. तसेच सिव्हील हॉस्पिटल येथे जे पीडित ॲडमिट आहेत त्यांचा पोलिसांनी जबाब नोंदवावा व सिव्हील हॉस्पीटलचे ग्रेव्हियंस सर्टिफिकेटवरुन वाढीव कलम म्हणून महिला विनयभंग व हाफ मर्डर प्रमाणे गुन्हे दाखल करावेत. तसेच कापूरवाडी गावातील अनाधिकृत क्रेशर अनाधिकृत मुरूम व खडी यांची वाहतूक त्वरित बंद करून या गुंड प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर आळा घालण्याचा शासनाने प्रयत्न करावा. आरोपींना अटक न झाल्यास याच दिवशी पोलीस अधीक्षक कार्यालयावर पोलिसांच्या निष्क्रीयतेच्या निषेधार्थ एकलव्य आघाडी तसेच वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आक्रोश मोर्चाचे नियोजन करण्यात येईल. पोलीसांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली म्हणून आदिवासी कलम ४ प्रमाणे पोलीसांच्या विरोधात कारवाई व्हावी या मुख्य मागणीसाठी मोर्चाचे नियोजन करण्यात येणार आहे, याची प्रशासनाने दखल घ्यावी.

# फायनान्स कंपनीत कर्मचाऱ्यांनी केला ७ लाख ११ हजारांचा अपहार

## कर्जदारांच्या कर्जाचे हप्ते गोळा करून पैसे बळकावले, चौघांवर गुन्हा दाखल

नगर – फायनान्स कंपनीच्या ४७ महिला कर्जदारांकडून चार कर्मचाऱ्यांनी कर्जाचे हप्ते वसुली करून ती रक्कम कंपनीकडे जमा न करता ७ लाख ११ हजार ६६६ रुपयांचा अपहार करत कंपनीची व महिला कर्जदारांची फसवणूक केल्याची घटना पाईपलाईन रोडवरील गुलाब नगर येथील भारत फायनांसीयल इन्क्लुजन कंपनीच्या शाखेत १ सप्टेंबर २०२२ ते १० मार्च २०२५ दरम्यान घडली.

याबाबत दिपक कारभारी बाणेदार (वय ३२, रा. गुलाब नगर, पाईपलाईन रोड) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे भारत फायनांसीयल इन्क्लुजन लि. शाखा, गुलाबनगर,पाईपलाईन रोड येथे ब्रँच क्रेडिट मॅनेजर आहे. त्या कंपनीत कैलास दिगंबर कोल्हे (वय २८, रा.भाहेगाव, ता.जि. नांदेड), सचिन सुरेश बेंबळे (वय ३१, रा. अंमळनेर, करजगाव ता. नेवासा), दत्तात्रय अशोक कदम (वय २८, रा. शिंगणापुर ता. नेवासा) हे कर्मचारी असून. तेजस् सुनिल बनसोडे (रा. हनुमंतगाव ता. राहाता) हे ब्रँच मॅनेजर या पदावर कार्यरत होते. त्यांचेकडे कर्जदार महिलांकडुन त्यांचे कर्जाचे हप्ते गोळा करणे व ज्या महिलांना कर्जाची गरज करणे, त्यांना कर्जपुरवठा करणे व या सर्व गोष्टीच्या संबंधीत कागदपत्रे कंपनीच्या शाखेत आणुन रेकॉर्डला ठेवणे. कर्जदार महिलांकडुन कर्जाचे दैनंदिन हप्ते गोळा केलेली रक्कम कंपनीच्या कार्यालयात रोजच्या रोज जमा करणे असे कामकाज होते.

या कंपनीत १ सप्टेंबर २०२२ ते १० मार्च २०२५ या कालावधीत एकुण ४७ महिला कर्जदारांकडुन वसुल केलेली ७ लाख ११ हजार ६६६ रुपये रक्कम गोळा केली. परंतु ती रक्कम कंपनीच्या कार्यालयात जमा केली नसुन ती रक्कम स्वतचे फायद्याकरिता वापरलेली आहे.या मध्ये कैलास कोल्हे याने १९ महिला कर्जदारांकडून वसुल केलेले ३ लाख ६८ हजार ८० रुपये, दत्तात्रय कदम याने दोन महिला कर्जदारकडून वसूल केलेले ४६ हजार २८७ रुपये, सचिन बेबळे याने १० महिला कर्जदारांकडून वसुल केलेले १ लाख ६६ हजार ३३९ रुपये, तेजस बनसोडे याने ८ महिला कर्जदारांकडून वसूल केलेले १ लाख ३२ हजार ९६० रुपये असे एकूण ७ लाख ११ हजार ६६६ रुपये कंपनीत जमा न करता कंपनीची व कर्जदार महिलांची फसवणूक केली.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघाविरुद्ध अपहार केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.अधिक तपास स.पो. नि. कल्पना चव्हाण या करीत आहेत.

## पाळत ठेवून दोन ठिकाणी भरदिवसा घरफोड्या

*(पान १ वरुन)*

जावुन पाहिले असता घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

त्यानंतर त्यांनी बेडरुममध्ये जावुन पाहिले असता आतील कपाटाचा दरवाजा उघडा असल्याचे व कपाटातील सर्व साहित्याची उचकापाचक केल्याचे दिसले. तसेच कपाटामध्ये ठेवलेले १.५ तोळे वजनाचे सोन्याचे चोकर, ३.५ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण, २.५ तोळे वजनाचा सोन्याचा राणीहार, १ ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, १.५ ग्रॅम वजनाचे रामपान त्यावर राम लिहीलेले, ५ हजार रुपये किंमतीची देवाची चांदीची मुर्ती, १८ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, एक अर्धा तोळ्याची व एक तोळा वजनाची अशा दोन पिळ्याच्या सोन्याच्या अंगठ्या असा ऐवज चोरुन नेला असल्याचे दिसले. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी शुभम पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केडगाव बायपासजवळ गांजा, ३ वाहने, ११ मोबाईलसह ८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**(पान १ वरुन)**

अंधाराचा फायदा घेवून दबा धरुन बसण्यास सांगितले. रात्री १०.४० चे सुमारास एक मालट्रक (क्र. एमएच १६ सी जी ०४५२) संशयास्पदरित्या टोलनाका पास करुन पुढे येताना दिसला. त्यातच गांजा असणार याबाबत संशय बळावल्याने पोलीस पथकाने मालट्रक थांबवून ट्रकचालकास विचारपुस केली. त्यावेळी तो आणि त्याच्या समवेत असलेले अन्य दोघेजण गडबडले.

पोलिसांनी ट्रकची पाहणी केली असता त्यात लोखंडी पोल, अँगल होते. परंतु ट्रकचे केबिनच्या वरच्या बाजूला ४ गोण्या बारदान्या खाली झाकलेल्या दिसल्या. त्यांची पाहणी केली असता त्यात खाकी रंगाचे चिकट टेपमध्ये विटांच्या आकाराचे पॅकबंद पॅकेट दिसून आले. त्याबाबत विचारणा केल्यावर ट्रक चालक संतोष प्रकाश दानवे (रा. वाळवणे, ता. पारनेर) याने त्यात गांजा असल्याचे सांगून तो बहिरमपुर, ओरिसा राज्यातून आणलेला असल्याचे सांगून तो गांजा घेण्यासाठी काही लोक टोलनाक्यापासून जवळच असलेल्या मोकळ्या मैदानात येणार आहेत, असे सांगितले.

पोलिसांनी या ट्रकचा पंचनामा सुरु केला असता चालकाच्या मोबाईलवर एका इसमाचा फोन आला व त्याने तुम्हाला केडगाव बायपास वर येण्यास किती वेळ लागेल असे विचारले. त्यावेळी पो.नि. दराडे यांनी शक्कल लढवत चालकाला त्याच्याशी व्यवस्थित बोलण्यास सांगून बोलावून घेतले. एका बाजुला वाहनाचे आडोशाला मुद्देमाल जप्ती पंचनामा चालु असताना अतिरिक्त



केडगाव बायपास परिसरात १० गांजा तस्करांना पकडल्या नंतर त्यांच्यासमवेत पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, पो.नि. प्रताप दराडे यांच्यासह कोतवाली पोलिसांचे पथक.

पोलीस अंमलदार यांना सदर ठिकाणाचे आजुबाजूला काही अंतरावर अंधारात दबा धरुन बसण्यास सांगितले.

सदर ठिकाणी काही वेळात एक लाल रंगाची स्वीफ्ट कार (क्र. एम. एस. १६. सीव्ही २७८६) व काळ्या रंगाची होंडा सिटी कार (क्र. एम.एच. १२ सी.डी. ३१२७) अशी दोन वाहने आली. सदर वाहनातील इसम मालट्रकची नंबरवरुन खात्री करित असताना त्यांना काही कळण्याचे आत अंधारात दबा धरून बसलेल्या साधे वेषातील पोलीसांनी दोन्ही चारचाकी वाहने व त्यात बसलेल्या इसमांना ताब्यात घेतले.

यामध्ये मालट्रक संतोष प्रकाश दानवे (वय ४०,रा. वाळवणे, ता. पारनेर), गणेश बापू भोसले (वय २५, रा. जवखेडे खालसा, ता. पाथर्डी), प्रशांत सुरेश मिरपगार (वय २५, रा. कामत शिगये, ता. पाथर्डी), प्रदिप बापू डहाणे (वय २९, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर), भगवान संजय डहाणे (वय २१, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर), संदिप केशव बाग (वय २९, रा. ओरिसा), दिलीप माखनो भेसरी (वय ३०,रा. घुडाधार, जि.बेनिका, राज्य ओरिसा), अक्षय बापू डहाणे (वय २५, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर), प्रमोद सुहास क्षेत्रे (वय २९, रा. आलमगीर, भिंगार), ईश्वर संतोष गायकवाड (वय २६, रा. पिंपळगाव लांडगा, ता. नगर) यांचा समावेश आहे. त्याच्या ताब्यातून १९ लाख ९० हजार रुपये किंमतीचा गांजा मालट्रक, २ कार व ११ मोबाईल असा एकूण ८८ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या १० जणांसह ओरिसा राज्यातील १ गांजा तस्कर अशा ११ जणांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, स.पो.नि. कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक शितल मुगडे, पोलिस अंमलदार बोडखे, रोहिणी दरंदले, राजेंद्र औटी, सचिन मिरपगार, गणेश चक्षाण, राहुल शिंदे, संदिप पितळे, दिपक रोहोकले, तानाजी पवार, दक्षिण विभाग मोबाईल सेलचे राहुल गुंडु, सुरज कदम, सचिन लोळगे, शिरीष तरटे, अतुल कोतकर, राम हंडाळ, संकेत धिवर, सोमनाथ राऊत, बाळासाहेब ढाकणे, अर्जुन फुंदे, प्रतिभा नागरे यांनी केली आहे.



नगर – सोलापुर रोडवरील हाँटेल मध्ये अफुच्या पावडची विक्री करणाऱ्यास पकडल्यानंतर त्याच्या समवेत नगर तालुका पोलिसांचे पथक.

# हॉटेलमध्ये अफुच्या पावडरची विक्री

## ९४० ग्रॅम पावडरसह एकाला नगर तालुका पोलिसांनी पकडले

नगर – नगर सोलापूर रोडवर साकत शिवारातील हॉटेल पंजाबी ढाबा या ठिकाणी नशा करण्यासाठी अफू या अंमलीपदार्थांची पावडर विक्री करणाऱ्या एकाला नगर तालुका पोलिसांनी पकडले आहे. त्याच्याकडून ९४० ग्रॅम पावडर जप्त करण्यात आली आहे. १९ जून रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून चंद्रकांत रघुनाथ शेळके (वय ५७, रा गुणवडी ता.नगर) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

नगर तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी स.पो. नि. प्रल्हाद गिते यांना सायंकाळच्या सुमारास गोपनीय माहिती मिळाली की, साकत शिवारातील नगर – सोलापुर महामार्गाच्या बाजुला हाँटेल पंजाबी ढाबा या विकाणी अफुच्या पावडरची विक्री होत आहे. सदरची माहीती त्यांनी तात्काळ नगर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांना कळवुन दोन पंच व वजनकाटा धारक यांना बोलावुन छापा टाकण्यासाठी पथक तयार केले. सदर पथक सायंकाळी ७ च्या सुमारास सदर हॉटेलमध्ये पोहचले असता तेथे चंद्रकांत शेळके हा अफूची पावडर हा अंमली पदार्थ नशेसाठी विक्री करत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातून अंदाजे १० हजार रुपये किंमतीची ९४० ग्रॅम अफुची पावडर जप्त करण्यात आली आहे.

सदरची कारवाई स.पो.नि. प्रल्हाद गिते, पोलिस उपनिरीक्षक उमेश पंतगे, उपनिरीक्षक भरत धुमाळ, पो.हे.कॉ. बाबासाहेब खेडकर, शरद वांढेकर, महिला पो.ना. गायत्री धनवडे, महिला पो. कॉ. सोनाली देशमुख, पो.कॉ. सागर मिसाळ यांनी केली आहे.

# गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांनी शहर परिसरात रात्रीची गस्त वाढविली

## २ दिवसांत रात्रीच्या वेळी संशयित रित्या फिरणाऱ्या ७ जणांना पकडून कारवाई

नगर – रात्रीच्या वेळी शहर व उपनगरात संशयास्पदरीत्या फिरणार्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. त्यानुसार शहर परिसरातील तोफखाना, कोतवाली, एमआयडीसी, भिंगार कॅम्प आणि नगर तालुका पोलीस ठाण्यांच्या पथकांनी रात्रीची गस्त वाढविली असून या गस्तीदरम्यान २ दिवसांत रात्रीच्या वेळी संशयित रित्या फिरणाऱ्या ७ जणांना पकडून त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ व १२४ अंतर्गत संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत शिवाजीनगर, कल्याण रस्ता येथे गस्त करत असताना पोलीस अंमलदार सुमित गवळी व भानुदास खेडकर यांनी मनोज गोरख मांजरे (वय २६,रा. शिवाजीनगर, कल्याण रस्ता) याला १८ जून रोजी रात्री १२.४५ वाजता संशयास्पदरीत्या फिरताना ताब्यात घेतले. कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील कायनेटिक चौक परिसरात रात्री १ वाजता एक संशयित इसम कुणालसिंग कमलसिंग जुत्री (वय १९,रा. काटवनखंडोबा, संजयनगर) हा फिरताना आढळून आला. चौकशीत तो चोरीच्या उद्देशाने हालचाली करत असल्याचा संशय बळावल्याने त्याच्याविरूध्द पोलीस कायदा कलम १२२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत शरद रामभाऊ जाधव (वय ४३, रा. विळद, ता. अहिल्यानगर) हा रात्री ११ वाजता एका लोखंडी बॉक्ससह संशयास्पदरीत्या फिरताना मिळून आला. त्याच्याकडे असलेल्या मालाबाबत समाधानकारक माहिती अथवा दस्तऐवज नसल्याने महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर तालुका पोलीस ठाणे हद्दीत सुपेश हिरामन महतो (वय २५, रा. बिहार, सध्या रा. चास, ता. नगर) हा १८ जून रोजी रात्री १ वाजता संशयास्पद स्थितीत फिरताना सापडला. पोलीस अंमलदार शिवाजी खरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्याच्याविरूध्द पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तसेच १९ जून रोजी रात्री नगर तालुका पोलिसांनी १ आणि एमआयडीसी पोलिसांनी २ ठिकाणी अशा कारवाया केल्या आहेत. नगर तालुक्यातील वाळुंज शिवारातील उड्डाणपुलाजवळ १९ जूनला रात्री १० च्या सुमारास राहुल माणिक गायकवाड (वय २२. रा.रुईछत्तीसी, ता.नगर) याला पकडण्यात आले. त्याच्या विरुद्ध पो.हे.कॉ.किशोर लाड यांच्या फिर्यादी वरून पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

एमआयडीसी पोलिसांनी नागापूर जिमखाना मैदानात रात्री ८.३० च्या सुमारास शैलेश दत्तात्रय फाटक (वय २४, रा. देहरे, ता.नगर) यास पकडले. त्याच्या विरुद्ध पो.हे.कॉ.सचिन अडबल यांच्या फिर्यादीवरून पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तर रात्री ९ वाजता रेणुकामाता मंदिर परिसरात अनिकेत दिपक अदमाने (वय १९, रा. एल अँड टी कंपनी, नागापूर) याला पकडले. त्याच्या विरुद्धही पो.हे.कॉ.सचिन अडबल यांच्या फिर्यादीवरून पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### हद्दपारी आदेशाचा भंग करणारा 'मडक्या' पकडला

प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगर जिल्ह्यातून २ वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेला सारसनगर परिसरातील सराईत गुन्हेगार शुभम उर्फ मडक्या मारुती धुमाळ (वय २५, रा.त्रिमूर्ती चौक, सारसनगर) हा या आदेशाचा भंग करून शहरात आलेला असल्याची माहिती मिळाल्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला १९ जून रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास सारसनगर पुलावर पकडले आहे.

या प्रकरणी त्याच्या विरुद्ध पो.कॉ. रवींद्र घुंगासे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



छापे टाकून पकडलेल्या आरोपींसमवेत पोलिस.

# शहरातील दोन जुगार अड्ड्यावर छापे

## ९ लाखांचा मुद्देमाल जप्त, जुगार खेळणाऱ्या ३१ इसमांविरुध्द कारवाई

नगर – बेकायदेशीररित्या पत्त्यांचा तिरट नावाचा जुगार सुरु असलेल्या दोन जुगार अड्ड्यावरील कारवाईत ९ लाख १७ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ३१ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. २० जूनला पहाटेच्या सुमारास नगर कल्याण रोडवरील हॉटेल दिनेशच्या पाठीमागे व अमरधामच्या बाजूला असलेल्या शेडमध्ये कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने शहरातील अमरधामच्या बाजुचे लोखंडी पुलाखाली पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला या कारवाईत १२ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ७४ हजार ५२० रुपये रोख रक्कम व १ लाख ४१ हजार रुपये किंमतीचे मोबाईल, मोटार सायकल व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख १५ हजार ५२० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत नगर कल्याण रोडवरील दिनेश हॉटेलच्या मागे एका पत्राचे शेड मध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून १७ इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून २ लाख ४६ हजार ८३० रुपये रोख व ४ लाख ६१ हजार १५० रुपये असा मुद्देमाल जप्त केला. या दोन्ही ठिकाणी जुगार खेळताना आढळलेल्या २९ इसमांविरुध्द व जागा उपलब्ध करुन देणारे २ असे ३१ इसमांविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर कारवाई पथक प्रमुख पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलिस अंमलदार शंकर चौधरी, मल्लिकार्जुन बनकर, अजय साठे, अरविंद भिंगारदिवे, दिनेश मोरे, दिगंबर कारखिले, उमेश खेडकर, सुनिल दिघे, अमोल कांबळे, संभाजी बोराडे, जालिंदर दहिफळे यांच्या पथकाने केली आहे.

# नागरिकांनी सवलतीचा लाभ घेऊन चालू वर्षाचा कर भरावा व दंड टाळावा

नगर – नवीन आर्थिक वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरासह बिले वाटप करण्यात आले आहे. महापालिका अधिनियमानुसार जून महिन्यापर्यंत सर्वसाधारण करावर ८ टक्के सवलत दिली जाते. ३० जून अखेर मुदत संपणार आहे. शहरातील ३७१५५ मालमत्ताधारकांनी आत्तापर्यंत सवलतीचा लाभ घेऊन कर भरला आहे. उर्वरित नागरिकांनीही ३० जून अखेर असलेल्या सवलतीचा लाभ घेऊन वेळेत कराचा भरणा करावा व दंड टाळावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

महापालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीला मागील आर्थिक वर्षात नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे विक्रमी वसुली झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार करात एप्रिलमध्ये १०%, मे व जूनमध्ये ८% अशी सर्वसाधारण करात सूट दिली जाते. या वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरानुसार बिले वाटप करण्यासाठी काही प्रमाणात विलंब झाला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात दिली जाणारी १०% सवलत अनेकांना मिळू शकली नाही. नवीन दरानुसार बिलांचे वाटप केल्याने काहींना उशिरा बिले मिळाली. त्यामुळे नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी मे महिन्यातही १० टक्के सवलत सर्वसाधारण करावर देण्यात आली होती. या काळात ३३९२८ मालमत्ताधारकांनी २२.८५ कोटींचा कर जमा केला.

आता जून अखेरपर्यंत ८ टक्के सवलत लागू आहे. आत्तापर्यंत ३१८६ मालमत्ताधारकांनी जून महिन्यात सवलत घेऊन २.२४ कोटींचा कर जमा केला आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात ३७१५५ मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेतला. त्यातून सुमारे २५.०९ कोटी रुपयांचा कर जमा झाला आहे. महानगरपालिकेने सेवा व सुविधांमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. कर वसुलीबाबत सोशल मीडियातून झालेल्या प्रभावी जनजागृतीमुळे सवलत घेणाऱ्या नागरिकांचे प्रमाण वाढले आहे. यंदाच्या वर्षी २४०९८ मालमत्ताधारकांनी रोख व चेक स्वरूपात भरणा केला. १०४११ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन पद्धतीने भरणा केला. तर २६०५ मालमत्ताधारकांनी मनपाच्या मोबाईल पद्धारे भरणा केला. यापूर्वी सवलत काळात सन २०२३–२४ मध्ये २२ कोटी, सन २०२४–२५ मध्ये २४ कोटी रुपये कर जमा झाला होता. यंदा सन २५–२६ मध्ये १८ जूनपर्यंत २५ कोटीपर्यंत भरणा झाला आहे. यावर्षी १०० कोटी कर वसुलीचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे. ३० जूनपर्यंत ८ टक्के सवलत मिळणार आहे. मुदत संपल्यानंतर कठोर कारवाई, जप्ती मोहीम सुरू केली जाणार आहे. त्यामुळे ज्यांना बिले मिळाली नसतील अशा नागरिकांनी त्यांच्या प्रभाग समिती कार्यालयात जाऊन बिल काढून घ्यावे व सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहनही यशवंत डांगे यांनी केले आहे.

# सावेडीतील अनधिकृत गॅस रिफीलिंग सेंटरवर छापा; २ लाख ६९ हजार रुपयाच्या मुद्देमालासह दोघे ताब्यात

नगर – घरगुती वापराचा गॅस अनधिकृतपणे वाहनांमध्ये भरणाऱ्या गॅस रिफिलिंग सेंटरवर तोफखाना पोलिसांनी छापा टाकत दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २ लाख ६९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १९ जून रोजी दुपारी सावेडी येथील जय आनंद हॉटेलच्या पाठीमागे एका पत्र्याच्या शेडमध्ये करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की सावेडी येथील जय आनंद हॉटेलच्या पाठीमागे एका पत्र्याच्या शेडच्या आडोशाला वैभव चंद्रकांत बारस्कर नावाचा इसम बेकायदेशीर रित्या शासनाचा कोणताही परवाना नसतांना एच.पी गॅस कंपनीच्या घरगुती गॅस टाक्याजवळ बाळगून लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे गॅस टाकीतुन गॅस काढून तो एलपीजी वाहनामध्ये अनधिकृत रित्या रिफिलिंग करीत आहे. अशी माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली.

त्या माहितीवरुन पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता त्या ठिकाणी मशीनला एक एच.पी गॅस कंपनीची घरगुती वापराची टाकी जोडून रिक्षा (क्र. एम एच १६, बी सी ०३६६) मध्ये गॅस भरत असलेल्या वैभव चंद्रकांत बारस्कर, (वय–२५, रा– तलाठी कार्यालयाजवळ, सावेडी गाव, अ.नगर) यास व रिक्षा चालक नितीन देवदत्त शेंडे (वय ४५, रा–ब्राम्हण गल्ली, भिंगार) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून एक स्प्रे पंप, एक डिजीटल इलेक्ट्रानिक लोखंडी प्लेट असलेला वजन काटा, १ एच.पी गॅस कंपनीच्या लाल रंगाची गॅस टाकी, एक घरगुती वापराची गॅस टाकी, अडीच लाख रुपये किमतीची बजाज कंपनीची रिक्षा असा २ लाख ६९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुजय हिवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १२५, २८७, २८८ सह जिवनावश्यक वस्तु कायदा १९९५ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार प्रमिला गायकवाड या करीत आहेत.

